# प्रकरण :सातवे

## सामाजिक  तथ्य संकलनाचे परिक्षण/विश्लेषण

७. प्रस्तावना

७.१  बालक व बालिका कामगारांचे धर्मानुसार विश्लेषण (सहसंबंध)

७.२  बालक व बालिका कामगारांचे त्यांच्या प्रवर्गानुसार विश्लेषण (सहसंबंध)

७.३  बालक व बालिका कामगारांचे त्यांच्या वयानुसार विश्लेषण (सहसंबंध)

७.४  बालक व बालिका कामगारांचे त्यांच्या शैक्षणिक पातळीनुसार विश्लेषण (सहसंबंध)

७.५  बालक व बालिका बालकामगारांचे शैक्षणिक स्तराचे विश्लेषण (सहसंबंध)

७.६  बालक व बालिका बालकामगारांच्या साक्षरता दराचे विश्लेषण (सहसंबंध)

७.७  बालक व बालिका बालकामगारांचे शाळा सोडण्याचे कारणाचे विश्लेषण (सहसंबंध)

७.८  बालक व बालिका  कामगारांचे वडील हयात असलेले किंवा नसलेलेबाबत विश्लेषण (सहसंबंध)

७.९  बालक व बालिका  कामगारांचे माता हयात असलेले किंवा नसलेलेबाबत विश्लेषण (सहसंबंध)

७.१० बालक व बालिका कामगारांच्या मातांची शैक्षणिक पातळीचे विश्लेषण (सहसंबंध)

७.११ बालक व बालिका  कामगारांच्या  वडीलांची शैक्षणिक पातळीचे विश्लेषण (सहसंबंध)

७.१२ बालक व बालिका कामगार हे स्थानिक आहेत कि स्थलांतरीत आहेत याचे विश्लेषण (सहसंबंध)

७.१३ बालक व बालिका कामगारांचे काम करण्याचे कारणाचे विश्लेषण (सहसंबंध)

७.१४ बालक व बालिका बालकामगार काम कसे करतात याचे विश्लेषण (सहसंबंध) :

७.१५ बालक व बालिका कामगारांचा काम करण्याच्या कालावधीचे विश्लेषण (सहसंबंध)

७.१६ बालक व बालिका कामगारांचे कामाच्या तासाचे विश्लेषण (सहसंबंध)

७.१७ बालक व बालिका कामगारांना काम करताना विश्रांती मिळते का नाही याबाबतचे विश्लेषण    (सहसंबंध)

७.१८ बालक व बालिका कामगारांना मिळणाऱ्या विश्रांतीच्या कालावधीचे विश्लेषण (सहसंबंध)

७.१९ बालक व बालिका कामगारांच्या मालकांच्या वर्तनाची पातळीचे विश्लेषण (सहसंबंध)

७.२० बालक व बालिका कामगारांचे मालकांच्या वर्तनाचे विश्लेषण (सहसंबंध)

७.२१ बालक व बालिका कामगार त्यांच्या कामाबाबत समाधानी आहेत किंवा नाही याचे विश्लेषण (सहसंबंध)

७.२२ बालक व बालिका बालकामगारांचे त्यांच्या कामाबाबतचे मत याचे विश्लेषण (सहसंबंध)

७.२३ बालक व बालिका कामगारांना मिळणाऱ्या फावल्या वेळेच्या उपयोगाचे विश्लेषण (सहसंबंध)

७.२४ बालक व बालिका बालकामगारांचे महत्वाकांक्षा/ध्येय याबाबतचे विश्लेषण (सहसंबंध)

७.२५ आई वडीलांना/पालकांना मदत करणारे बालक व बालिका बालकामगारांचे विश्लेषण (सहसंबंध)

७.२६ विशेष शाळेत शिक्षण घेणाऱ्या बालक व बालिका बालकामगारांचे विश्लेषण (सहसंबंध)

# प्रकरण :सातवे
# सामाजिक  तथ्य संकलनाचे परिक्षण/विश्लेषण

## ७. प्रस्तावना :

प्रस्तुत प्रकरणात संशोधनासाठी गोळा केलेले तथ्याचे परिक्षण/विश्लेषण केले आहे. प्रस्तुत प्रकरणात अभ्यासासाठी निवडलेल्या बालकामगारांची  सामाजिक समस्यांचा, बालकामगारांच्या पुनर्वसनाचा शोध घेऊन त्यामध्ये बालक व बालिका कामगारांचे सहसंबंधाचे परिक्षण/विश्लेषण करण्यात आले आहे. बालकामगारांची सामाजिक स्थिती, समस्या, बालकामगारांचे पुनर्वसन अभ्यासताना प्रामुख्याने अनुसूचीद्वारे विचारण्यात आलेल्या प्रश्नांतून व मिळालेल्या प्राथमिक माहितीतून सोलापूरातील बालकामगारांमध्ये बालक व बालिका कामगारांचे सहसंबंधाचे परिक्षण करुन समस्या व पुनर्वसनाची मांडणी केली आहे. सोलापूरातील एकूण २६० बालकामगारांची अभ्यासासाठी निवड केली आहे. या २६० बालकामगारांमध्ये सोलापूर शहरातील बालकामगार बहूलता क्षेत्रातील १३० बालकामगार व राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पातील विशेष शाळेतील शैक्षणिक पुनर्वसनातील १३० बालकामगार असे एकूण २६० बालकामगारांची निवड करण्यात आली आहे. या २६० बालकामगारांमध्ये बालक व बालिका कामगारांच्या सहसंबंधाचे परिक्षण/विश्लेषण  अभ्यासावरुन निघालेले निष्कर्ष संपूर्ण सोलापूर जिल्हयासाठी लागू केले आहेत. एकूणच प्रस्तूत प्रकरणात अतिशय सुक्ष्मरित्या सोलापूरातील बालकामगारांची  सामाजिक स्थिती, समस्या, व त्यांचे पुनर्वसनाची स्थिती स्पष्ट केली आहे.

## ७.१बालक व बालिका कामगारांचे धर्मानुसार विश्लेषण/परिक्षण (सहसंबंध) :

मुख्यत: भारतात अनेक धर्मातील लोक आर्थिक व सामाजिकदृष्टया कमकुवत असल्याने त्या धर्मात बालकामगारांची समस्या जास्त पसरत चालली आहे. त्यामुळेच प्रस्तुत प्रकरणात बालक व बालिका कामगारांची धर्मनिहाय स्थिती अभ्यासणे महत्वाचे आहे. पुढील तक्ता क्र. ७.१ मध्ये बालक व बालिका कामगारांचे धर्मनिहाय स्वरुप (सहसंबंध) स्पष्ट केले आहे.

## तक्ता क्र. ७.१

## बालक व बालिका कामगारांचे धर्मानुसार विश्लेषण

**Relationship between Religion and Gender of Child Labour**

| धर्म | | लिंग | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | बालिका | बालक | |
| हिंदू | उत्तरदात्यांची संख्या | ६७ | ८० | १४७ |
| | टक्केवारी | २५.८% | ३०.८% | ५६.५% |
| बौद्ध | उत्तरदात्यांची संख्या | २७ | ३३ | ६० |
| | टक्केवारी | १०.४% | १२.७% | २३.१% |
| ख्रिश्चन | उत्तरदात्यांची संख्या | ९ | ९ | १८ |
| | टक्केवारी | ३.५% | ३.५% | ६.९% |
| मुस्लिम | उत्तरदात्यांची संख्या | १७ | १८ | ३५ |
| | टक्केवारी | ६.५% | ६.९% | १३.५% |
| एकूण | उत्तरदात्यांची संख्या | १२० | १४० | २६० |
| | टक्केवारी | ४६.२% | ५३.८% | १००.०% |

पुढील आलेखामध्ये बालक व बालिका कामगारांचे धर्मानुसार सहसंबंध दर्शविले आहे.

## आलेख क्र. ७.१

## बालक व बालिका कामगारांचे धर्मानुसार सहसंबंध




वरील तक्ता क्र. ७.१ मध्ये बालक व बालिका कामगारांचे त्यांच्या धर्मानुसार विश्लेषण (सहसंबंध) दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये ४६.२% मुलींचे प्रमाण आहे. तर

५३.८% मुलांचे प्रमाण आहे. बालकामगारांमध्ये मुलांपेक्षा मुलींचे प्रमाण देखिल अधिक आहे. मुलांप्रमाणे किंबहूना त्याहीपेक्षा अधिक प्रतिकूल सामाजिक व आर्थिक स्थिती मुलांच्या बाबतीत असते. एकूण बालकामगारांपैकी धर्मानुसार  ५६.५% हिंदू धर्मातील बालकामगार आहेत त्यामध्ये २५.८% मुली आहेत आणि ३०.८% मुले आहेत. म्हणजे हिंदू धर्मात मुलींचे प्रमाण तुलनेने कमी आहे. बौद्ध धर्मातील बालकामगार २३.१% आहे. त्यामध्ये १०.४% मुली आहेत आणि १२.७% मुले आहेत. ख्रिश्चन धर्मातील एकूण बालकामगार ६.९% आहेत. त्यामध्ये ९% मुली व ९% मुले आहेत. ख्रिश्चन धर्मात मुलींचे व मुलांचे प्रमाण समान आहे. मुस्लीम धर्मातील एकूण बालकामगार १३.५% आहेत. त्यामध्ये ६.५% मुली आणि ६.९% मुले आहेत. याचा अर्थ ख्रिश्चन धर्म वगळता बाकी धर्मात मुलांच्या तुलनेत मुलींचे प्रमाण कमी आहेत.

## ७.२ बालक व बालिका कामगारांचे त्यांच्या प्रवर्गानुसार विश्लेषण (सहसंबंध) :

बालक व बालिका कामगारांचे धर्मनिहाय अध्ययन केल्यानंतर त्यांचे प्रवर्गनिहाय स्वरुप अभ्यासणे गरजेचे आहे. कारण, प्रस्तुत संशोधनाचा मुख्य उद्देश असा आहे की, बालकामगारांच्या आर्थिक व सामाजिक स्थिती, समस्येत बालकामगारांतील विविध प्रवर्गातील बालक व बालिका कामगारांचे प्रमाण शोधणे होय. म्हणूनच संशोधकाने बालक व बालिका कामगारांच्या प्रवर्गनिहाय सहसंबंधाचा अभ्यास केला आहे. पुढील तक्ता क्र. ७.२ मध्ये बालक व बालिका कामगारांचे जाती–जमातीनुसार वर्गीकरण केले आहे.

**तक्ता क्र. ७.२**

**बालक व बालिका  कामगारांचे प्रवर्गानुसार विश्लेषण**

**Relationship between Categoryand Gender of Child Labour**

| प्रवर्ग | | लिंग | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | बालिका | बालक | |
| खुला वर्ग | उत्तरदात्यांची संख्या | २७ | ३३ | ६० |
| | टक्केवारी | १०.४% | १२.७% | २३.१% |
| ओ.बी.सी | उत्तरदात्यांची संख्या | ३३ | ३८ | ७१ |
| | टककेवारी | १२.७% | १४.६% | २७.३% |
| एस.सी. | उत्तरदात्यांची संख्या | ३७ | ५८ | ९५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | टककेवारी | १४.२% | २२.३% | ३६.५ |
| एस.टी. | उत्तरदात्यांची संख्या | २३ | ११ | ३४ |
| | टककेवारी | ८.८% | ४.२% | १३.१% |
| एकूण | उत्तरदात्यांची संख्या | १२० | १४० | २६० |
| | टककेवारी | ४६.२% | ५३.८% | १००.०% |

पुढील आलेखामध्ये बालक व बालिका कामगारांचे प्रवर्गानुसार सहसंबंध दर्शविले आहे.

**आलेख क्र. ७.२**

**बालक व बालिका कामगारांचे प्रवर्गानुसार सहसंबंध**




वरील तक्ता क्र. ७.२ मध्ये बालक व बालिका कामगारांचे त्यांच्या प्रवर्गानुसार विश्लेषण (सहसंबंध) दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण ४६.२% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ५३.८% आहे. खुल्या वर्ग गटातील एकूण २३.१% बालकामगार आहेत. त्यामध्ये १०.४% मुली आहेत आणि १२.७% मुले आहेत. याचा अर्थ असा की, खुल्या प्रवर्ग गटामध्यील बालकामगारांमध्ये मुलांचे प्रमाण जास्त आहे. इतर मागासवर्गीय प्रवर्गात एकूण बालकामगार २७.३% आहे. त्यामध्ये १२.७% मुली आहेत आणि १४.६% मुले आहेत. याचा अर्थ खुल्या वर्गापेक्षा इतर मागासवर्गात बालकामगारांची संख्या जास्त आहे. इतर मागासवर्गीय प्रवर्गामध्येही मुलींचे प्रमाण कमी आहे आणि मुलांचे प्रमाण

जास्त आहे. अनुसूचित जाती प्रवर्गामध्ये एकूण ३६.५% बालकामगार आहेत. त्यामध्ये मुलींचे प्रमाण १४.२% आहे तर मुलांचे प्रमाण २२.३% आहे. म्हणजे अनुसूचित जातीमध्ये मुलांचे प्रमाण जास्त आहे. खुला वर्ग आणि इतर मागासवर्गा पेक्षा अनुसूचित जातीमध्ये बालकामगारांचे प्रमाण जास्त आहे. अनुसूचित जमाती मध्ये एकूण बालकामगारांची संख्या १३.१% आहे. यामध्ये मुलांचे प्रमाण ८.८% आहे तर मुलांचे प्रमाण ४.२% आहे. याचा अर्थ अनुसूचित जमातीमध्ये मुलींचे प्रमाण जास्त आहे. परंतू वरील इतर प्रवर्गापैकी अनुसूचित जमातीमधील बालकामगारांचे प्रमाण तुलनेने कमी आहे.

याचा अर्थ असा की, सर्वात कमी बालकामगार असलेला प्रवर्ग अनुसूचित जमातीचा आहे. आणि सर्वात जास्त बालकामगार असलेला प्रवर्ग अनुसूचित जातीचा आहे. अनुसूचित जमाती वगळता इतर जमातीमध्ये मुलांच्या तुलनेने मुलींचे प्रमाण कमी आहे.

## ७.३ बालक व बालिका कामगारांचे त्यांच्या वयानुसार विश्लेषण (सहसंबंध) :

बालकामगारांच्या वयोरचनेचा अभ्यास करण्याचा मुख्य उद्देश असा की, १४ वर्ष व त्यापेक्षा कमी वय असणाऱ्या बालिका व बालकांचा शोध घेणे. कारण १४ वर्षापेक्षा कमी वयाचे बालक व बालिका बालकामगार म्हणून काम करत असेल तर त्या जिल्हयासाठी, राज्यासाठी व देशासाठी चिंतेचा विषय आहे. प्रस्तूत पाहणीतील बालक व बालिका कामगारांचे वयानूसार सहसंबंध वर्गीकरण तक्ता क्र. ७.३ मध्ये स्पष्ट केले आहे.

**तक्ता क्र. ७.३**

**बालक व बालिका कामगारांचे वयानुसार विश्लेषण**

**Relationship between Age and Gender of Child Labour**

| वय | | लिंग | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | बालिका | बालक | |
| ९ | उत्तरदात्यांची संख्या | ८ | ६ | १४ |
| | टक्केवारी | ३.१% | २.३% | ५.४% |
| १० | उत्तरदात्यांची संख्या | १७ | २२ | ३९ |
| | टक्केवारी | ६.५% | ८.५% | १५.०% |
| ११ | उत्तरदात्यांची संख्या | २१ | २४ | ४५ |
| | टक्केवारी | ८.१% | ९.२% | १७.३% |
| १२ | उत्तरदात्यांची संख्या | ३६ | ४५ | ८१ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | टक्केवारी | १३.८% | १७.३% | ३१.२% |
| १३ | उत्तरदात्यांची संख्या | २२ | २० | ४२ |
| | टक्केवारी | ८.५% | ७.७% | १६.२% |
| १४ | उत्तरदात्यांची संख्या | १६ | २३ | ३९ |
| | टक्केवारी | ६.२% | ८.८% | १५.०% |
| एकूण | उत्तरदात्यांची संख्या | १२० | १४० | २६० |
| | टक्केवारी | ४६.२% | ५३.८% | १००.०% |

पुढील आलेखामध्ये बालक व बालिका कामगारांचे वयानुसार सहसंबंध दर्शविले आहे.

**आलेख क्र. ७.३**

**बालक व बालिका कामगारांचे वयानुसार सहसंबंध**




वरील तक्ता क्र. ७.३ मध्ये बालक व बालिका कामगारांचे त्यांच्या वयानुसार विश्लेषण (सहसंबंध) दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये वय वर्षे ९ असलेले एकूण ५.४% बालकामगार आहेत. यामध्ये ३.१% मुली आहेत तर २.३% मुले आहेत. म्हणजे वयवर्षे ९ असलेल्या बालकामगारांमध्ये मुलींचे प्रमाण जास्त आहे. वयवर्षे १० असलेले एकूण १५.०% बालकामगार आहेत. त्यामध्ये ६.५% मुली आहेत आणि ८.५% मुले आहेत. याचा अर्थ असा की वयोगट १० मध्ये मुलींचे प्रमाण कमी आहे आणि मुलांचे प्रमाण जास्त आहे. वयवर्षे ११ मध्ये एकूण बालकामगार १७.३% आहेत. यामध्ये ८.१% मुली असून ९.२% मुले आहेत. याचा अर्थ असा की, ११ वयोगटामध्ये मुलींचे प्रमाण कमी आहे आणि मुलांचे प्रमाण जास्त

आहे. वयवर्षे १२ मध्ये एकूण ३१.२% बालकामगार आहेत. त्यामध्ये १३.८% मुली आहेत तर १७.३% मुले आहेत. याचा अर्थ असा की, १२ वयोगटामध्येही मुलींचे प्रमाण कमी आहे. वयवर्षे १३ मध्ये एकूण १६.२% बालकामगार आहेत. यामध्ये ८.५% मुली आहेत तर ७.७% मुले आहेत. याचा अर्थ वयवर्षे १३ वयोगटात मुलींचे प्रमाण जास्त आहे. त्याचप्रमाणे वयवर्षे १४ वयोगटात एकूण १५.०% बालकामगार आहेत. यामध्ये ६.२% मुली असून ८.८% मुले आहेत. याचा अर्थ असा की, १४ वयोगटातही मुलींचे प्रमाण कमी आहे.

थोडक्यात, वयवर्षे १२ या वयोगटातील जास्त बालकामगार आहेत त्यानंतर ११, १३, १० वर्षे वयोगटात अधिक बालकामगार असल्याचे दिसते. ९ वर्षे वयोगटात सर्वात कमी बालकामगार आहेत.

### ७.४ बालक व बालिका कामगारांचे त्यांच्या शैक्षणिक पातळीनुसार विश्लेषण (सहसंबंध) :

भारताच्या संविधानामध्ये १४ वर्षे वयोगटाच्या प्रत्येक व्यक्तीस शिक्षण मिळायला पाहिजे हा त्यांचा मुलभूत अधिकार आहे असे नमुद केले आहे. परंतू तो अधिकार सर्वांनाच मिळतो का? याचा शोध घेण्यासाठी वय वर्षे १४ च्या आतील बालक बालिकांना अनुसूचीद्वारे विचारण्यात आलेल्या प्रश्नांतून विचारण्यात आले. सोलापूरातील बालकामगारांचा शिक्षणाचा दर्जा पाहिल्यानंतर असे दिसून येते. त्या बालकांचे फक्त नांव शाळेत दाखले केले आहे. प्रत्यक्षात मात्र नियमित ते शाळेत जात नाही. ज्यांचे शिक्षण चौथी पर्यंतचे झाले आहे त्यांना लिहीता वाचता सुद्धा येत नाही. याचा अर्थ असा की शासनाला या बाबींकडे गांभिर्याने पाहण्याची आवश्यकता आहे. कारण सुशिक्षित बालक हाच उद्याच्या भारताचा भविष्य आहे. बालकामगारांच्या बाबतीत असलेले कायदे, योजना यांचे ज्ञान या बालकामगारांना नाही. पुढील तक्ता क्र. ७.४ मध्ये बालक व बालिका कामगारांची शैक्षणीक पातळीचे सहसंबंध स्पष्ट केले आहे.

## तक्ता क्र. ७.४

## बालक व बालिका कामगारांचे शैक्षणिक पातळीचे विश्लेषण

**Relationship between Education Level and Gender of Child Labour**

| शैक्षणिक पातळी | | लिंग | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | बलिका | बालक | |
| अशिक्षित | उत्तरदात्यांची संख्या | ७ | ६ | १३ |
| | टक्केवारी | २.७% | २.३% | ५.०% |
| बालवाडी ते दुसरी | उत्तरदात्यांची संख्या | १४ | २१ | ३५ |
| | टक्केवारी | ५.४% | ८.१% | १३.५% |
| ३ री ते चौथी | उत्तरदात्यांची संख्या | ४८ | २७ | ७५ |
| | टक्केवारी | १८.५% | १०.४% | २८.८% |
| ५ वी ते ६ वी | उत्तरदात्यांची संख्या | ३३ | ५९ | ९२ |
| | टक्केवारी | १२.७% | २२.७% | ३५.४% |
| ७ वी ते ८ वी | उत्तरदात्यांची संख्या | १८ | २७ | ४५ |
| | टक्केवारी | ६.९% | १०.४% | १७.३% |
| एकूण | उत्तरदात्यांची संख्या | १२० | १४० | २६० |
| | टक्केवारी | ४६.२% | ५३.८% | १००.०% |

पुढील आलेखामध्ये बालक व बालिका कामगारांचे शैक्षणिक पातळीनुसार सहसंबंध दर्शविले आहे.

## आलेख क्र. ७.४

## बालक व बालिका कामगारांचे शैक्षणिक पातळीनुसार सहसंबंध



वरील तक्ता क्र. ७.४ मध्ये बालक व बालिका कामगारांचे त्यांच्या शैक्षणिक पातळीनुसार विश्लेषण (सहसंबंध) दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये ४६.२% मुलींचे प्रमाण आहे तर ५३.८% मुलांचे प्रमाण आहे. बालकामगारांमध्ये मुलांप्रमाणे मुलींचे प्रमाण देखिल अधिक आहे. मुलांप्रमाणेच किंबहूना त्याहीपेक्षा अधिक प्रतिकूल सामाजिक व आर्थिक स्थिती मुलींच्या बाबतीत असते. बालकामगारांपैकी शैक्षणिक पातळीनुसार ५% बालकामगार अशिक्षित आहेत. त्यामध्ये मुलींचे प्रमाण अधिक २.७% आहे. बालकामगारांमध्ये तिसरी व चौथी वर्गापर्यत शिकलेल्या बालकामगारांची संख्या २८.८% आहे. त्यामध्येही मुलींचे प्रमाण मुलांपेक्षा अधिक म्हणजे १८.५% इतकी आहे. मुलींच्या शिक्षणाकडे अधिक दुर्लक्ष झाल्याचे पुढील विश्लेषणावरुन सांगता येईल.

बालवाडी ते दुसरी पर्यंत शाळेत गेलेल्या बालकामगारांमध्ये मुलींचे प्रमाण ५.४% इतके असून मुलांचे प्रमाण ८.१% इतके अधिक आहे. पाचवी व सहावी पर्यंत शाळेत गेलेल्या बालकामगारांमध्ये मुलींचे प्रमाण १२.७% इतके कमी असून मुलांचे प्रमाण २२.७% इतके अधिक आहे. सातवी व आठवी वर्गापर्यंत पोहचलेल्या बालकामगारांची संख्या मुळातच कमी १७.३% आहे. त्यामध्ये मुलींचे प्रमाण केवळ ६.९% इतके कमी आहे आणि मुलांचे प्रमाण १०.४% इतके आहे. शैक्षणिक पातळीनुसार तिसरी व चौथी वर्गातील मुलींचे प्रमाण एकूण मुलींच्या संख्येत तुलनेने अधिक १८.५% आहे. परंतू, दुसऱ्या बाजूला पाचवी व सहावी वर्गातील मुलांचे प्रमाण एकूण मुलांच्या संख्येत तुलनेने अधिक २२.७% आहे.

अर्थात, जरी मुले आणि मुली या बालकामगारांमध्ये शैक्षणिक पातळी कमी असण्याची समस्या असण्याबरोबरच मुलींच्या बाबतीत ती अधिक गंभिर बाब आहे हे आपणास त्यांच्या शैक्षणिक पातळीवरुन लक्षात येते.

**Education Level & Gender**

**Chi – Square Tests**

| Test | Value | df | Asymo.Sig (2 – Sided) |
|---|---|---|---|
| Pearson Chi - Squre | 15.055 [a] | 4 | 0.005 |

गृहीतके : बालकामगारांची शैक्षणीक पातळी आणि बालकामगार मुलां – मुलींचे प्रमाण यांचा सहसंबंध आहे.

$H_0$ = सहसंबंध नाही.

$H_1$ = सहसंबंध आहे.

स्पष्टीकरण :

सोलापूर शहरातील एकूण २६० बालकामगारांमध्ये १२० मुलींची संख्या आहे आणि १४० मुलांची संख्या आहे. परंतु बालकामगारामध्ये मुलां–मुलींची संख्या आणि त्यांच्या शैक्षणिक पातळीत काही सहसंबंध आहे का? हे पाहणे महत्वाचे वाटते. हे तपासून पाहण्यासाठी **Chi – Square Tests**चा वापर केला आहे. त्यामध्ये **Level of Significance**हा ५% घेतला आहे, वरील गृहीतकासाठी **Degree of freedom (df)**हे ४ आहे. **Level of Significance** आणि **df** यांच्या साहाय्याने **Chi – Square Tests** ची **Table Value** ही ९.४८८८ इतकी आहे. बालकामगारांच्या एकूण २६० प्रतिसादाच्या माध्यमातून प्राप्त झालेली **Chi – Square Tests** ची **computed Test Value** ही १५.०५५ इतकी आहे. प्राप्त माहितीमध्ये **computed Chi – Square Test Value** ही **Table Value** पेक्षा अधिक असल्यामुळे गृहीतकातील $H_0$ आपण नाकारतो आणि $H_1$ चा स्विकार करतो. याचा अर्थ असा की, बालकामगारातील मुलांमुलींचे प्रमाण आणि त्यांची शैक्षणिक पातळी यांचा जवळचा संबंध आहे. शिक्षणाची पातळी कमी असल्यास बालकामगार मुलांमुलींचे प्रमाण अधिक असते आणि याउलट त्यांची शैक्षणिक पातळी अधिक असेल तर बालकामगारांची संख्या कमी दिसते. तक्त्यातील **SignificanceLevel** देखिल या सहसंबंधाला पुष्टी देतो. कारण त्यांची **Value** बरोबर ०.००५ इतकी आहे.

थोडक्यात, बालकामगारांसाठी शिक्षण महत्वाचे असले तरी त्यांना पुरेसे शिक्षण मिळाले नाही. बालकामगारांमध्ये अशिक्षित व पहिली – दुसरी शिकलेल्या मुलां–मुलींचे प्रमाण अधिक आहे. मुलांसाठी १४ वर्षापर्यंत मोफत शिक्षण सुविधा असूनही अनेक मुलांपर्यंत हे शिक्षण पोहचलेले नाही ही वस्तूस्थिती आहे.

### ७.५ बालक व बालिका बालकामगारांचे शैक्षणिक स्तराचे विश्लेषण (सहसंबंध) :

मानवी जीवनात शिक्षणाला अन्यन्यसाधारण महत्व आहे. कारण शिक्षणामुळे व्यक्तीच्या सुप्त गुणांचा विकास होतो आणि पर्यायाने त्याचे रुपांतर मानव विकासात होतो. प्रस्तुत

पाहणीतील जवळपास ७३ टक्के बालक व बालिका कामगारांनी शाळा सोडली आहे. काही बालक व बालिका कामगारांनी शाळेत जावेसे वाटते असे उत्तर दिले तर काही बालक कामाला जात असल्यामुळे कधीतरी शाळेत जातो असे पाहणीत आढळून आले. पुढील तक्ता क्र. ७.५ मध्ये बालकामगारांचा शैक्षणिक स्तराचा सहसंबंध स्पष्ट केला आहे.

**तक्ता क्र. ७.५**

**बालक व बालिका बालकामगारांचे शैक्षणिक स्तराचे विश्लेषण**

**Relationship between Education Level of child labour and Gender of Child Labour**

| बालकामगाराचे शैक्षणिक स्तर | | लिंग | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | बालिका | बालक | |
| शाळा सोडली | उत्तरदात्यांची संख्या | ७७ | ११४ | १९१ |
| | टक्केवारी | २९.६% | ४३.८% | ७३.५% |
| शाळेत जावेसे वाटते | उत्तरदात्यांची संख्या | ३१ | १० | ४१ |
| | टक्केवारी | ११.९% | ३.८% | १५.८% |
| शाळेत जातात | उत्तरदात्यांची संख्या | २ | ५ | ७ |
| | टक्केवारी | ०.८% | १.९% | २.७% |
| शाळेत कधीतरी जातो | उत्तरदात्यांची संख्या | १० | ११ | २१ |
| | टक्केवारी | ३.८% | ४.२% | ८.१% |
| एकूण | उत्तरदात्यांची संख्या | १२० | १४० | २६० |
| | टक्केवारी | ४६.२% | ५३.८% | १००.०% |

पुढील आलेखामध्ये बालक व बालिका कामगारांचे शैक्षणिक स्तराचे सहसंबंध दर्शविले आहे.

**आलेख क्र. ७.५**

**बालक व बालिका कामगारांचे शैक्षणिक स्तराचे सहसंबंध**



वरील तक्ता क्र. ७.५ मध्ये बालक व बालिका कामगारांचे शैक्षणिक स्तराचे विश्लेषण (सहसंबंध) दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये बालिका कामगारांचे प्रमाण ४६.२% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ५३.८% आहे. २९.६% बालिका कामगारांनी शाळा सोडली आहे तर ४३.८% बालक कामगारांनी शाळा सोडली आहे. शाळा सोडण्याचे प्रमाणात बालिका कामगारांचे प्रमाण कमी आहे तर बालक कामगारांचे प्रमाण जास्त आहे. ११.९% बालिका कामगारांना शाळेत जावेसे वाटते तर ३.८% बालक कामगारांना शाळेत जावेसे वाटते. शाळेत जावेसे वाटत असणाऱ्या बालकामगारांमध्ये बालिका कामगारांचे प्रमाण जास्त आहे तर बालक कामगारांचे प्रमाण कमी आहे. ०.८% बालिका कामगार शाळेत जातात तर १.९% बालक कामगार शाळेत जातात. शाळेत जाणाऱ्या बालकामगारांमध्ये बालिका कामगारांचे प्रमाण कमी आहे तर बालक कामगारांचे प्रमाण जास्त आहे. ३.८% बालिका कामगार कधीतरी शाळेत जातात तर ४.२% बालक कामगार कधीतरी शाळेत जातात. कधीतरी शाळेत जाणाऱ्या बालकामगारांमध्ये बालिका कामगारांचे प्रमाण कमी आहे तर बालक कामगारांचे प्रमाण जास्त आहे.

वरील विश्लेषणावरुन असे लक्षात येते की, बहूतांशी बालकामगारांनी शाळा सोडली आहे. शाळा सोडणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण कमी आहे तर बालक कामगारांचे प्रमाण जास्त आहे. जवळपास ७३.५% बालकामगारांनी शाळा सोडली आहे.

## Chi – Square Tests

| Test | Value | df | Asymo.Sig (2 – Sided) |
|---|---|---|---|
| **Pearson Chi - Squre** | **17.824[a]** | **3** | **.000** |

**गृहीतके : बालकामगारांचे त्यांच्या शिक्षणाबाबतचे मत आणि बालकामगार मुलां – मुलींचे प्रमाण यांचासहसंबंध आहे.**

**$H_0$ = सहसंबंध नाही.**

**$H_1$ = सहसंबंध आहे.**

**स्पष्टीकरण :**

**सोलापूर शहरातील एकूण २६० बालकामगारांमध्ये १२० मुलींची संख्या आहे आणि १४० मुलांची संख्या आहे. परंतु बालकामगारामध्ये मुलां–मुलींची संख्या आणि त्यांच्या शिक्षणाबाबतचे मत यांचा काही सहसंबंध आहे का? हे पाहणे महत्वाचे वाटते. हे तपासून पाहण्यासाठी Chi – Square Testsचा वापर केला आहे. त्यामध्ये Level of Significanceहा ५% घेतला आहे, वरील गृहीतकासाठी Degree of freedom (df)हे ३ आहे. Level of Significance आणि df यांच्या साहाय्याने Chi – Square Tests ची Table Value ही ७.८१५ इतकी आहे. बालकामगारांच्या एकूण २६० प्रतिसादाच्या माध्यमातून प्राप्त झालेली Chi – Square Tests ची computed Test Value ही १७.८२४ इतकी आहे. प्राप्त माहितीमध्ये computed Chi – Square Test Value ही Table Value पेक्षा अधिक असल्यामुळे गृहीतकातील $H_0$ आपण नाकारतो आणि $H_1$ चा स्विकार करतो. याचा अर्थ असा की, बालकामगारातील मुलांमुलींचे प्रमाण आणि त्यांचे शिक्षणाबाबतचे मत यांचा जवळचा संबंध आहे. बालकामगार मुलांमुलींचे प्रमाण खुप कमी आहे. विशेषतः मुली बालकामगार यांना शिक्षण घ्यावेसे वाटते परंतू घरच्या परिस्थितीमुळे त्यांना मजबूरीने काम करावे लागत आहे. तक्त्यातील SignificanceLevel देखिल या सहसंबंधाला पुष्टी देतो. कारण त्यांची Value बरोबर .००० इतकी आहे.**

### ७.६ बालक व बालिका बालकामगारांच्या साक्षरता दराचे विश्लेषण (सहसंबंध) :

प्रस्तुत पाहणीतील बालक व बालिका कामगारांच्या समस्येचा अभ्यास करताना बालक व बालिका कामगारांच्या साक्षरता स्तराचा अभ्यास करणे महत्वाचे आहे. कारण त्यांच्या साक्षरतेवरुन त्यांचा शैक्षणिक विकास लक्षात येईल. पुढील तक्ता क्र. ७.६ मध्ये बालक व बालिका कामगारांचा साक्षरता स्तराचा सहसंबंध स्पष्ट केला आहे.

**तक्ता क्र. ७.६**

**बालक व बालिका बालकामगारांचा साक्षरता दराचे विश्लेषण**

**Relationship between Literacy Rate and Gender of Child Labour**

| बालकामगारांचा साक्षरता दर | | लिंग | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | बालिका | बालक | |
| अशिक्षित | उत्तरदात्यांची संख्या | १ | १ | २ |
| | टक्केवारी | ०.४% | ०.४% | ०.८% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्राथमिक | उत्तरदात्यांची संख्या | १०० | १०५ | २०५ |
| | टक्केवारी | ३८.५% | ४०.४% | ७८.८% |
| उच्च प्राथमिक | उत्तरदात्यांची संख्या | १८ | ३२ | ५० |
| | टक्केवारी | ६.९% | १२.३% | १९.२% |
| माध्यमिक | उत्तरदात्यांची संख्या | १ | २ | ३ |
| | टक्केवारी | ०.४% | ०.८% | १.२% |
| एकूण | उत्तरदात्यांची संख्या | १२० | १४० | २६० |
| | टक्केवारी | ४६.२% | ५३.८% | १००.०% |

पुढील आलेखामध्ये  बालक व बालिका कामगारांचे साक्षरता दराचे सहसंबंध दर्शविले आहे.

**आलेख क्र. ७.६**

**बालक व बालिका कामगारांचे साक्षरता दराचे सहसंबंध**




वरील तक्ता क्र. ७.६ मध्ये बालक व बालिका कामगारांच्या साक्षरता दराचे विश्लेषण (सहसंबंध) दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये बालिका कामगारांचे प्रमाण ४६.२% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ५३.८% आहे.  अशिक्षित असणाऱ्या बालक व बालिका कामगारांचे प्रमाण ०.४% आहे. प्राथमिक पर्यंत शिक्षण घेणाऱ्यांमध्ये बालिका कामगारांचे प्रमाण ३८.५% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ४०.४% आहे. प्राथमिक पर्यंत शिक्षण

घेणाऱ्यांमध्ये बालिका कामगारांचे प्रमाण कमी आहे तर बालक कामगारांचे प्रमाण जास्त आहे. उच्च प्राथमिक पर्यंत शिक्षण घेणाऱ्यांमध्ये बालिका कामगारांचे प्रमाण ६.९% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण १२.३% आहे. उच्च प्राथमिक पर्यंत शिक्षण घेणाऱ्यांमध्ये बालिका कामगारांचे प्रमाण कमी आहे तर बालक कामगारांचे प्रमाण जास्त आहे. माध्यमिक पर्यंत शिक्षण घेणाऱ्यांमध्ये बालिका कामगारांचे प्रमाण ०.४% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ०.८% आहे. माध्यमिक पर्यंत शिक्षण घेणाऱ्यांमध्ये बालिका कामगारांचे प्रमाण कमी आहे तर बालक कामगारांचे प्रमाण जास्त आहे.

याचा अर्थ असा आहे की, केवळ प्राथमिक पर्यंत शिक्षण घेणाऱ्या बालकामगारांचे प्रमाण ७८.८% आहे. यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण कमी आहे तर बालक कामगारांचे प्रमाण जास्त आहे. परंतू या बालकामगारांना प्राथमिक शिक्षण घेऊनही लिहीता वाचता येत नाही. म्हणजेच बाल वयात काम केल्यामुळे यांच्या शिक्षणावर प्रतिकूल परिणाम झाला आहे.

### ७.७ बालक व बालिका बालकामगारांचे शाळा सोडण्याचे कारणाचे विश्लेषण (सहसंबंध) :

प्रत्यक्ष पाहणीत अनुसूचीद्वारे विचारलेल्या प्रश्नांद्वारे असे आढळून आले की, बालक व बालिका कामगारांचे शाळा सोडण्यामागचे विविध कारण आहेत. असे कोणते कारण आहेत ज्यामुळे बालक व बालिका कामगारांना शाळा सोडावी लागली त्याचा सहसंबंध पुढील तक्ता क्र. ७.७ मध्ये स्पष्ट केले आहे.

**तक्ता क्र. ७.७**

**बालक व बालिका बालकामगारांचे शाळा सोडण्याचे कारणाचे विश्लेषण**

**Relationship between Causes Behind School Leaving and Gender of Child Labour**

| बालकामगारांचे शाळा सोडण्याचे कारण | | लिंग | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | बालिका | बालक | |
| शाळेत जावेसे वाटत नाही | उत्तरदात्यांची संख्या | ८ | १२ | २० |
| | टक्केवारी | ३.४% | ५.०% | ८.४% |
| शाळेचे वातावरण आवडत नाही | उत्तरदात्यांची संख्या | २ | ७ | ९ |
| | टक्केवारी | ०.८% | २.९% | ३.८% |
| शिक्षक शिक्षा करतात | उत्तरदात्यांची संख्या | १ | ५ | ६ |
| | टक्केवारी | ०.४% | २.१% | २.५% |
| गरीबी | उत्तरदात्यांची संख्या | ७ | ८ | १५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | टक्केवारी | २.९% | ३.४% | ६.३% |
| घरातील वातावरण | उत्तरदात्यांची संख्या | ८१ | ८७ | १६८ |
| | टक्केवारी | ३४.०% | ३६.६% | ७०.६% |
| घरात कोणी शिकलेले नाही | उत्तरदात्यांची संख्या | १ | ३ | ४ |
| | टक्केवारी | ०.४% | १.३% | १.७% |
| काम करत असल्यामुळे | उत्तरदात्यांची संख्या | ६ | १० | १६ |
| | टक्केवारी | २.५% | ४.२% | ६.७% |
| एकूण | उत्तरदात्यांची संख्या | १०६ | १३२ | २३८ |
| | टक्केवारी | ४४.५% | ५५.५% | १००.०% |

पुढील आलेखामध्ये बालक व बालिका कामगारांचे शाळा सोडण्याच्या कारणाचे सहसंबंध दर्शविले आहे.

**आलेख क्र. ७.७**

**बालक व बालिका कामगारांचे शाळा सोडण्याच्या कारणाचे सहसंबंध**




वरील तक्ता क्र. ७.७ मध्ये बालक व बालिका कामगारांचे शाळा सोडण्याचे कारणाचे विश्लेषण (सहसंबंध) दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये बालिका कामगारांचे प्रमाण ४४.५% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ५५.५% आहे. शाळेत जावेसे वाटत नाही म्हणून शाळा सोडणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण ३.४% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण

५.०% आहे. शाळेत जावेसे वाटत नाही म्हणून शाळा सोडणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण कमी आहे तर बालक कामगारांचे प्रमाण जास्त आहे. शाळेचे वातावरण आवडत नाही म्हणून शाळा सोडणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण ०.८% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण २.९% आहे. शाळेचे वातावरण आवडत नाही म्हणून शाळा सोडणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण कमी आहे तर बालक कामगारांचे प्रमाण जास्त आहे. शिक्षक शिक्षा करतात म्हणून शाळा सोडणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण ०.४% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण २.१% आहे. शिक्षक शिक्षा करतात म्हणून शाळा सोडणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण कमी आहे तर बालक कामगारांचे प्रमाण जास्त आहे. गरीबी मुळे शाळा सोडणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण २.९% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ३.४% आहे. गरीबीमुळे शाळा सोडणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण कमी आहे तर बालक कामगारांचे प्रमाण जास्त आहे. घरातील वातावरणामुळे शाळा सोडणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण ३४.०% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ३६.६% आहे. घरातील वातारणामुळे शाळा सोडणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण कमी आहे तर बालक कामगारांचे प्रमाण जास्त आहे. घरात कोणी शिकले नाही म्हणून शाळा सोडणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण ०.४% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण १.३% आहे. घरात कोणी शिकले नाही म्हणून शाळा सोडणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण कमी आहे तर बालक कामगारांचे प्रमाण जास्त आहे. काम करत असल्यामुळे शाळा सोडणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण २.५% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ४.२% आहे. काम करत असल्यामुळे शाळा सोडणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण कमी आहे तर बालक कामगारांचे प्रमाण जास्त आहे.

वरील विश्लेषणातून असे लक्षात येते की, घरातील वातावरण अत्यंत बिकट असल्यामुळे बालकामगारांना शिक्षणात रस वाटत नाही. जवळपास ७०.६% बालकामगारांनी घरातील वातावरणामुळे शाळा सोडली आहे. ३४.०% बालिका कामगार व ३६.६% बालक कामगारांनी या कारणामुळे शाळा सोडली आहे. याचा अर्थ असा की, घरातील रोजचे भांडण, बिकट परिस्थिती, दारिद्रय या घरातील वातावरणामुळे त्यांच्या शिक्षणावर प्रतिकूल परिणाम झाला आहे.

### ७.८ बालक व बालिका  कामगारांचे वडील हयात आहेत किंवा नाही याबाबतचे विश्लेषण

**(सहसंबंध) :**

प्रस्तुत अभ्यासात बालक व बालिका कामगारांचे वडील हयात आहेत किंवा नाहीत याचा अभ्यास करणे महत्वाचे आहे. कारण, ज्या कुटूंबातील बालकामगारांचे वडील हयात नाहीत त्या कुटूंबाची सर्व जबाबदारी त्या बालकाच्या आईवर असते. ज्या कुटूंबामध्ये वडील हयात आहेत त्याठिकाणी एकतर ते बेरोजगार आहेत किंवा त्यांना मिळणारे उत्पन्न कमी आहे. पुढील तक्ता क्र. ७.८ मध्ये बालक व बालिका कामगारांच्या कुटूंबात वडील हयात असलेले आणि नसलेले बालकामगार प्रमाणाचे सहसंबंध स्पष्ट केले आहे.

**तक्ता क्र. ७.८**

**बालक व बालिका कामगारांचे वडील हयात असलेले किंवा नसलेलेबाबत विश्लेषण**

**Relationship between child labours father is dead or alive and Gender of Child Labour**

| वडील आहेत किंवा नाही | | लिंग | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | बालिका | बालक | |
| वडील आहेत | उत्तरदात्यांची संख्या | ९६ | १०८ | २०४ |
| | टक्केवारी | ३६.९% | ४१.५% | ७८.५% |
| वडील नाहीत | उत्तरदात्यांची संख्या | २४ | ३२ | ५६ |
| | टक्केवारी | ९.२% | १२.३% | २१.५% |
| एकूण | उत्तरदात्यांची संख्या | १२० | १४० | २६० |
| | टक्केवारी | ४६.२% | ५३.८% | १००.०% |

पुढील आलेखामध्ये बालक व बालिका कामगारांच वडील हयात असलेले किंवा नसल्याबाबतचे सहसंबंध दर्शविले आहे.

**आलेख क्र. ७.८**

**बालक व बालिका कामगारांचे वडील हयात असलेले किंवा नसल्याबाबतचे सहसंबंध**




वरील तक्ता क्र. ७.८ मध्ये बालक व बालिका कामगारांचे वडील हयात आहेत किंवा नाही याबाबतचे विश्लेषण (सहसंबंध) दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये मुलींचे प्रमाण ४६.२% आहे तर मुलांचे प्रमाण ५३.८% आहे. एकूण ३६.९% मुलींचे वडील हयात आहेत तर ४१.५% मुलांचे वडील हयात आहेत. आणि एकूण ९.२% मुलींचे वडील हयात नाहीत तर १२.३% मुलांचे वडील हयात नाहीत. मुलींच्या तुलनेत मुलांचे वडील हयात असल्याचे प्रमाण जास्त आहे तर वडील हयात नसलेल्यामध्येही मुलांचे प्रमाण जास्त आहे. कुटूंबात वडील असणे हि महत्वाची गोष्ट आहे. वडील नसल्यामुळे घरची जबाबदारी आईवर असते. आईचेही उत्पन्न कमी असल्याने मजबूरीने मुलांमुलींना काम करावे लागते ही खेदाची गोष्ट आहे.

## ७.९ बालक व बालिका कामगारांचे माता हयात आहेत किंवा नाही याबाबतचे विश्लेषण (सहसंबंध) :

प्रस्तुत अभ्यासात बालक व बालिका कामगारांचे माता हयात आहेत किंवा नाहीत याचा अभ्यास करणे महत्वाचे आहे. कारण, ज्या कुटूंबातील बालकामगारांचे माता हयात नाहीत त्यांची परिस्थिती विशेष चिंताजनक आहे. वडीलांना मिळणारे कमी उत्पन्न, बेरोजगारी यामुळे

बालकांना काम करावे लागत आहे. पुढील तक्ता क्र. ७.९ मध्ये बालक व बालिका कामगारांच्या कुटूंबात माता हयात असलेले आणि नसलेले विश्लेषणाचे सहसंबंध स्पष्ट केले आहे.

**तक्ता क्र. ७.९**

**बालक व बालिका कामगारांचे माता हयात असलेले किंवा नसलेलेबाबत विश्लेषण**

**Relationship between child labours mother is dead or alive and Gender of Child Labour**

| माता आहेत किंवा नाही | | लिंग | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | बालिका | बालक | |
| माता आहेत | उत्तरदात्यांची संख्या | ११३ | १३७ | २५० |
| | टक्केवारी | ४३.५% | ५२.७% | ९६.२% |
| माता नाहीत | उत्तरदात्यांची संख्या | ७ | ३ | १० |
| | टक्केवारी | २.७% | १.२% | ३.८% |
| एकूण | उत्तरदात्यांची संख्या | १२० | १४० | २६० |
| | टक्केवारी | ४६.२% | ५३.८% | १००.०% |

पुढील आलेखामध्ये बालक व बालिका कामगारांच्या माता हयात असलेले किंवा नसलेल्याबाबतचे सहसंबंध दर्शविले आहे.

**आलेख क्र. ७.९**

**बालक व बालिका कामगारांच्या माता हयात असलेले किंवा नसलेल्या बाबतचे सहसंबंध**



वरील तक्ता क्र. ७.९ मध्ये बालक व बालिका कामगारांचे माता हयात आहेत किंवा नाही याबाबतचे विश्लेषण (सहसंबंध) दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये मुलींचे प्रमाण ४६.२% आहे तर मुलांचे प्रमाण ५३.८% आहे. एकूण ४३.५% मुलींचे माता हयात आहेत तर ५२.७% मुलांचे माता हयात आहेत. आणि एकूण २.७% मुलींचे माता हयात नाहीत तर १.२% मुलांचे माता हयात नाहीत. मुलांच्या तुलनेत मुलींचे माता हयात नसल्याचे प्रमाण जास्त आहे तर माता हयात असलेल्यामध्ये मुलांचे प्रमाण जास्त आहे. कुटूंबात माता असणे हि महत्वाची गोष्ट आहे. माता नसल्यामुळे घरची परिस्थिती अत्यंत बिकट होते. माता नसल्यामुळे घरातील काम करण्याची जबाबदारी सहसा मुलींवर असते त्यामुळे घरचे काम करुन बाहेरही हया मुलींना काम करावे लागते. एकंदरीत मुलींची परिस्थिती अत्यंत बिकट बनते.

### ७.१० बालक व बालिका कामगारांच्या मातांची शैक्षणिक पातळीचे विश्लेषण (सहसंबंध) :

कुटूंबामध्ये आई शिक्षित असल्यास कुटूंबातील पाल्याचा शैक्षणिक विकासास मोठया प्रमाणात चालना मिळते. प्रस्तुत अध्ययनात निवडलेल्या बालक व बालिका कामगारांपैकी बहुतांशी बालकामगारांच्या माता हया अशिक्षित आहेत. पुढील तक्ता क्र. ७.१० मध्ये बालक व बालिका कामगारांच्या मातांची शैक्षणिक पातळीचे सहसंबंध स्पष्ट केले आहे.

**तक्ता क्र. ७.१०**

**बालक व बालिका  कामगारांचे मातांच्या शिक्षणाच्या पातळीचे विश्लेषण**

**Relationship between Mother Education Level  and Gender of Child Labour**

| मातांची शैक्षणिक पातळी | | लिंग | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | बालिका | बालक | |
| अशिक्षित | उत्तरदात्यांची संख्या | ६४ | ९० | १५४ |
| | टक्केवारी | २५.६% | ३६.०% | ६१.६% |
| १ ली ते ४ थी | उत्तरदात्यांची संख्या | ४० | २८ | ६८ |
| | टक्केवारी | १६.०% | ११.२% | २७.२% |
| ५ वी ते ७ वी | उत्तरदात्यांची संख्या | ७ | १० | १७ |
| | टक्केवारी | २.८% | ४.०% | ६.८% |
| ८ वी ते १० वी | उत्तरदात्यांची संख्या | १ | ९ | १० |
| | टक्केवारी | ०.४% | ३.६% | ४.०% |
| ११ वी ते १२ वी | उत्तरदात्यांची संख्या | १ | ० | १ |
| | टक्केवारी | ०.४% | ०.०% | ०.४% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| एकूण | उत्तरदात्यांची संख्या | ११३ | १३७ | २५० |
| | टक्केवारी | ४५.२% | ५४.८% | १००.०% |

पुढील आलेखामध्ये बालक व बालिका कामगारांच्या मातांचे शैक्षणिक पातळीचे सहसंबंध दर्शविले आहे.

### आलेख क्र. ७.१०

### बालक व बालिका कामगारांच्या मातांचे शैक्षणिक पातळीचे सहसंबंध




वरील तक्ता क्र. ७.१० मध्ये बालक व बालिका कामगारांच्या मातांची शैक्षणिक पातळीचे विश्लेषण (सहसंबंध) दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये मुलींचे प्रमाण ४५.२% आहे तर मुलांचे प्रमाण ५४.८% आहे. एकूण २५.६% मुलींच्या माता हया अशिक्षित आहेत तर ३६.६% मुलांच्या माता हया अशिक्षित आहेत. कुटूंबामध्ये माता अशिक्षित असणे हि चांगली बाब नाही. कारण घरामध्ये स्त्री शिक्षित असेल तर आपल्या मुलांनाही शिक्षित करते. परंतु मातांना शिक्षण महत्व माहित नसल्याने त्यांच्या मुलांमुलींनाही शिक्षणाचे गांभिर्य नाही. म्हणूनच बऱ्याच बालकामगारांनी आपले शालेय शिक्षण सोडून काम करण्याचा मार्ग स्विकारला आहे. हि बाब अत्यंत खेदाची आहे. एकूण २५.६% मुलींच्या माता हया अशिक्षित आहेत त्याचा परिणाम मुलींवरही झाला आहे. मुलींनी शाळा सोडली आहे आणि ते काम करत

आहेत. म्हणजे मोठे झाल्यावर त्याचे सुद्धा असेच चक्र पुढे सुरु राहते. भविष्याच्या दुष्टीकोनातून मुलींच्या बाबतीतील ही गोष्ट विशेष चिंताजनक आहे. १६.०% बालिका कामगारांच्या माता यांनी १ ली ते ४ थी पर्यंतचे शिक्षण घेतलेले आहे तर ११.२% बालक कामगारांच्या मातांनी १ ली ते ४ थी पर्यंतचे शिक्षण घेतलेले आहे. १ ली ते ४ थी पर्यंतचे शिक्षण घेणाऱ्या बालिका कामगारांच्या मातांचे प्रमाण जास्त आहे तर बालक कामगारांच्या मातांचे प्रमाण कमी आहे. २. ८% बालिका कामगारांच्या माता यांनी ५ वी ते ७ वी पर्यंतचे शिक्षण घेतलेले आहे तर ४. ०% बालक कामगारांच्या मातांनी ५ वी ते ७ वी पर्यंतचे शिक्षण घेतलेले आहे. ५ वी ते ७ वी पर्यंतचे शिक्षण घेणाऱ्या बालिका कामगारांच्या मातांचे प्रमाण कमी आहे तर बालक कामगारांच्या मातांचे प्रमाण जास्त आहे. ०.४% बालिका कामगारांच्या माता यांनी ८ वी ते १० वी पर्यंतचे शिक्षण घेतलेले आहे तर ३.६% बालक कामगारांच्या मातांनी ८ वी ते १० वी पर्यंतचे शिक्षण घेतलेले आहे. ८ वी ते १० वी पर्यंतचे शिक्षण घेणाऱ्या बालिका कामगारांच्या मातांचे प्रमाण कमी आहे तर बालक कामगारांच्या मातांचे प्रमाण जास्त आहे. ०.४% बालिका कामगारांच्या माता यांनी ११ वी ते १२ वी पर्यंतचे शिक्षण घेतलेले आहे तर बालक कामगारांच्या मातांनी १० वी पुढील शिक्षण घेतलेले नाही. ११ वी ते १२ वी पर्यंतचे शिक्षण घेणाऱ्या बालिका कामगारांच्या मातांचे प्रमाण जास्त आहे. वरील विश्लेषणातून हे स्पष्ट होते की, ५ वी ते १२ वी पर्यंत शिक्षण घेतलेल्या मातांचे प्रमाण खूप कमी आहे.

## Chi – Square Tests

| Test | Value | df | Asymo.Sig (2 – Sided) |
|---|---|---|---|
| **Pearson Chi - Squre** | **12.246[a]** | **4** | **.016** |

**गृहीतके : बालकामगारांच्या मातांची शैक्षणिक पातळी आणि बालकामगार मुलां – मुलींचे प्रमाण यांचा सहसंबंध आहे.**

**$H_0$ = सहसंबंध नाही.**

**$H_1$ = सहसंबंध आहे.**

**स्पष्टीकरण :**

**सोलापूर शहरातील एकूण २६० बालकामगारांमध्ये १२० मुलींची संख्या आहे आणि १४० मुलांची संख्या आहे. परंतु बालकामगारामध्ये मुलां–मुलींची संख्या आणि त्यांच्या मातांच्या शैक्षणिक**

पातळीचा काही सहसंबंध आहे का? हे पाहणे महत्वाचे वाटते. हे तपासून पाहण्यासाठी **Chi – Square Tests**चा वापर केला आहे. त्यामध्ये **Level of Significance**हा ५% घेतला आहे, वरील गृहीतकासाठी **Degree of freedom (df)**हे ४ आहे. **Level of Significance** आणि **df** यांच्या साहाय्याने **Chi – Square Tests** ची **Table Value** ही ९.४८८८ इतकी आहे. बालकामगारांच्या एकूण २६० प्रतिसादाच्या माध्यमातून प्राप्त झालेली **Chi – Square Tests** ची **computed Test Value** ही १२.२४६ इतकी आहे. प्राप्त माहितीमध्ये **computed Chi – Square Test Value** ही **Table Value** पेक्षा अधिक असल्यामुळे गृहीतकातील $H_0$ आपण नाकारतो आणि $H_1$ चा स्विकार करतो. याचा अर्थ असा की, बालकामगारातील मुलांमुर्लीचे प्रमाण आणि त्यांच्या माताची शैक्षणिक पातळी यांचा जवळचा संबंध आहे. बालकामगार मुलां मुलीच्या मातांची शिक्षणाची पातळी कमी असल्यास बालकामगार मुलांमुलींचे प्रमाण अधिक असते आणि याउलट बालकामगार मुलां मुलीच्या मातांची शैक्षणिक पातळी अधिक असेल तर बालकामगारांची संख्या कमी दिसते. तक्त्यातील **SignificanceLevel** देखिल या सहसंबंधाला पुष्टी देतो. कारण त्यांची **Value** बरोबर .०१६ इतकी आहे.

थोडक्यात, जर कुटूंबात आई वडील किंवा पालक जर सुशिक्षित असतील किंवा जास्त शिकलेले असतील तर ते मुलांमुलींच्या शिक्षणाच्या बाबतीत गंभिर असतात. याठिकाणी पालकांनाच शिक्षणाचे गांभिर्य नसल्याने त्यांनी बालकामगारांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष केले आहे परिणामी बालमजूरी वाढत आहे.

### ७.११ बालक व बालिका कामगारांच्या वडीलांची शैक्षणिक पातळीचे विश्लेषण (सहसंबंध) :

प्रस्तूत अध्ययनात बरेच बालक व बालिका कामगारांचे वडील अशिक्षित असल्याचे आढळून आले आहे. पुढील तक्ता क्र. ७.११ मध्ये बालक व बालिका कामगारांच्या वडीलांची शैक्षणिक पातळीचे सहसंबंध स्पष्ट केले आहे.

**तक्ता क्र. ७.११**

**बालक व बालिका कामगारांचे वडीलांची शैक्षणिक पातळीचे विश्लेषण**

**Relationship between Father Education Level and Gender of Child Labour**

| वडीलांची शैक्षणिक पातळी | | लिंग | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | बालिका | बलक | |
| अशिक्षित | उत्तरदात्यांची संख्या | ३३ | ४४ | ७७ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | टक्केवारी | १६.२% | २१.६% | ३७.७% |
| १ ली ते ४ थी | उत्तरदात्यांची संख्या | ४२ | २७ | ६९ |
| | टक्केवारी | २०.६% | १३.२% | ३३.८% |
| ५ वी ते ७ वी | उत्तरदात्यांची संख्या | १६ | १९ | ३५ |
| | टक्केवारी | ७.८% | ९.३% | १७.२% |
| ८ वी ते १० वी | उत्तरदात्यांची संख्या | ४ | १३ | १७ |
| | टक्केवारी | २.०% | ६.४% | ८.३% |
| ११ वी ते १२ वी | उत्तरदात्यांची संख्या | १ | ५ | ६ |
| | टक्केवारी | ०.५% | २.५% | २.९% |
| एकूण | उत्तरदात्यांची संख्या | ९६ | १०८ | २०४ |
| | टक्केवारी | ४७.१% | ५२.९% | १००.०% |

पुढील आलेखामध्ये बालक व बालिका कामगारांच्या वडीलांच्या शैक्षणिक पातळीचे सहसंबंध दर्शविले आहे.

**आलेख क्र. ७.११**

**बालक व बालिका कामगारांच्या वडीलांच्या शैक्षणिक पातळीचे सहसंबंध**




वरील तक्ता क्र. ७.११ मध्ये बालक व बालिका कामगारांच्या वडीलांची शैक्षणिक पातळीचे विश्लेषण (सहसंबंध) दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये मुलींचे प्रमाण ४७.१% आहे तर मुलांचे प्रमाण ५२.९% आहे. एकूण १६.२% मुलींचे वडील हे अशिक्षित आहेत तर २१.६% मुलांचे वडील हे अशिक्षित आहेत. वडील स्वत: अशिक्षित असल्यामुळे त्यांनी मुलांमुलींच्या शिक्षणाला गांभिर्याने घेतलेले नाही. म्हणूनच बऱ्याच बालकामगारांनी

आपले शालेय शिक्षण सोडून काम करण्याचा मार्ग स्विकारला आहे. हि बाब अत्यंत खेदाची आहे. २०.६% बालिका कामगारांच्या वडीलांनी १ ली ते ४ थी पर्यंतचे शिक्षण घेतलेले आहे तर १३.२% बालक कामगारांच्या वडीलांनी १ ली ते ४ थी पर्यंतचे शिक्षण घेतलेले आहे. १ ली ते ४ थी पर्यंतचे शिक्षण घेणाऱ्या बालिका कामगारांच्या वडीलांचे प्रमाण जास्त आहे तर बालक कामगारांच्या वडीलांचे प्रमाण कमी आहे. बालक कामगारांच्या दृष्टीकोनातून ही बाब विशेष चिंताजनक आहे. कारण बहूसंख्य बालक कामगारांनी आपले प्राथमिक शिक्षण घेतल्यानंतर पुढील शिक्षण घेतलेले नाही. ७.८% बालिका कामगारांच्या वडीलांनी ५ वी ते ७ वी पर्यंतचे शिक्षण घेतलेले आहे तर ९.३% बालक कामगारांच्या वडीलांनी ५ वी ते ७ वी पर्यंतचे शिक्षण घेतलेले आहे. ५ वी ते ७ वी पर्यंतचे शिक्षण घेणाऱ्या बालिका कामगारांच्या वडीलांचे प्रमाण कमी आहे तर बालक कामगारांच्या वडीलांचे प्रमाण जास्त आहे. २.०%बालिका कामगारांच्या वडीलांनी ८ वी ते १० वी पर्यंतचे शिक्षण घेतलेले आहे तर ६.४% बालक कामगारांच्या वडीलांनी ८ वी ते १० वी  पर्यंतचे शिक्षण घेतलेले आहे. ८ वी ते १० वी पर्यंतचे शिक्षण घेणाऱ्या बालिका कामगारांच्या वडीलांचे प्रमाण कमी आहे तर बालक कामगारांच्या वडीलांचे प्रमाण जास्त आहे. ०.५% बालिका कामगारांच्या वडीलांनी ११ वी ते १२ वी पर्यंतचे शिक्षण घेतलेले आहे तर २.५ बालक कामगारांच्या वडीलांनी ११ वी ते १२ वी पर्यंतचे शिक्षण घेतलेले आहे. ११ वी ते १२ वी पर्यंतचे शिक्षण घेणाऱ्या बालिका कामगारांच्या वडीलांचे प्रमाण कमी आहे. ५ ते १२ पर्यत शिक्षण घेणाऱ्या बालिका कामगारांच्या वडीलांचे प्रमाण कमी आहे. ज्याअर्थी वडीलांचेच शिक्षण कमी असल्यामुळे त्यांनी मुलांच्या शिक्षणाकडेही दुर्लक्ष केल्याचे दिसते आणि त्यांना श्रमाच्या बाजाराज श्रम करण्यासाठी पाठवून दिले आहे.

## Chi – Square Tests

| Test | Value | df | Asymo.Sig (2 – Sided) |
|---|---|---|---|
| **Pearson Chi - Squre** | **11.856[a]** | **4** | **.018** |

**गृहीतके : बालकामगारांच्या वडीलांची शैक्षणिक पातळी आणि बालकामगार मुलां – मुलींचे प्रमाण यांचा सहसंबंध आहे.**

$H_0$ = सहसंबंध नाही.

$H_1$ = सहसंबंध आहे.

स्पष्टीकरण :

सोलापूर शहरातील एकूण २६० बालकामगारांमध्ये १२० मुलींची संख्या आहे आणि १४० मुलांची संख्या आहे. परंतु बालकामगारामध्ये मुलां–मुलींची संख्या आणि त्यांच्या वडीलांची शैक्षणिक पातळीचा काही सहसंबंध आहे का? हे पाहणे महत्वाचे वाटते. हे तपासून पाहण्यासाठी **Chi – Square Tests**चा वापर केला आहे. त्यामध्ये **Level of Significance**हा ५% घेतला आहे, वरील गृहीतकासाठी **Degree of freedom (df)**हे ४ आहे. **Level of Significance** आणि **df** यांच्या साहाय्याने **Chi – Square Tests** ची **Table Value** ही ९.४८८ इतकी आहे. बालकामगारांच्या एकूण २६० प्रतिसादाच्या माध्यमातून प्राप्त झालेली **Chi – Square Tests** ची **computed Test Value** ही ११.८५६ इतकी आहे. प्राप्त माहितीमध्ये **computed Chi – Square Test Value** ही **Table Value** पेक्षा अधिक असल्यामुळे गृहीतकातील $H_0$ आपण नाकारतो आणि $H_1$ चा स्विकार करतो. याचा अर्थ असा की, बालकामगारातील मुलांमुलींचे प्रमाण आणि त्यांच्या वडीलांची शैक्षणिक पातळी यांचा जवळचा संबंध आहे. बालकामगार मुलां मुलीच्या वडीलांची शिक्षणाची पातळी कमी असल्यास बालकामगार मुलांमुलींचे प्रमाण अधिक असते आणि याउलट बालकामगार मुलां मुलीच्या वडीलांची शैक्षणिक पातळी अधिक असेल तर बालकामगारांची संख्या कमी दिसते. तक्त्यातील **SignificanceLevel** देखिल या सहसंबंधाला पुष्टी देतो. कारण त्यांची **Value** बरोबर .०१८ इतकी आहे.

थोडक्यात, जर कुटूंबात आई वडील किंवा पालक जर सुशिक्षित असतील किंवा जास्त शिकलेले असतील तर ते मुलांमुलींच्या शिक्षणाच्या बाबतीत गंभिर असतात. याठिकाणी पालकांनाच शिक्षणाचे गांभिर्य नसल्याने त्यांनी बालकामगारांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष केले आहे परिणामी बालमजूरी वाढत आहे.

७.१२ बालक व बालिका कामगार हे स्थानिक आहेत कि स्थलांतरीत आहेत याचे विश्लेषण (सहसंबंध) :

प्रस्तूत अध्ययनात बालक व बालिका कामगार हे स्थानिक आहेत का स्थलांतर करुन आलेले आहेत हे पाहणे आवश्यक आहे. पुढील तक्ता क्र. ७.१२ मध्ये बालकामगारांच्या निवासाची स्थितीचे सहसंबंध स्पष्ट केले आहे.

## तक्ता क्र. ७.१२

## बालक व बालिका कामगारांचे स्थानिक/स्थलांतरीतबाबतचे विश्लेषण

**Relationship between Local or Migrate Child Labour and Gender of Child Labour**

| बालकामगारांचे स्थानिक/स्थलांतरीत | | लिंग | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | बालिका | बालक | |
| स्थानिक सोलापूर | उत्तरदात्यांची संख्या | १२० | १४० | २६० |
| | टक्केवारी | ४६.२% | ५३.८% | १००.०% |
| एकूण | उत्तरदात्यांची संख्या | १२० | १४० | २६० |
| | टक्केवारी | ४६.२% | ५३.८% | १००.०% |

पुढील आलेखामध्ये बालक व बालिका कामगार हे स्थानिक आहेत कि स्थलांतरीत आहेत याबाबतचे सहसंबंध दर्शविले आहे.

## आलेख क्र. ७.१२

## बालक व बालिका कामगारांचे स्थानिक/स्थलांतरीत असलेल्याबाबतचे सहसंबंध



तक्ता क्र. ७.१२ मध्ये बालक व बालिका कामगार हे स्थानिक आहेत कि स्थलांतरीत आहेत याचे विश्लेषण (सहसंबंध) दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये बालिका कामगारांचे प्रमाण ४६.२% तर बालक कामगारांचे प्रमाण ५३.८% आहे. २६० बालकामगारांमध्ये सर्व बालकामगार हे सोलापूरातील स्थानिक बालकामगार आहेत. याचा अर्थ निवडलेल्या बालकामगारांत स्थलांतर करुन आलेले एकही बालकामगार नाही.

### ७.१३ बालक व बालिका कामगारांचे काम करण्याचे कारणाचे विश्लेषण (सहसंबंध) :

घरातील बालक लहानपणातच बालकामगार बनतात यापेक्षा त्या कुटूंबाचे दुसरे दुर्दैव काही असू शकत नाही. परंतू सदरील कुटूंबाचा आर्थिक व सामाजिकदृष्टया असलेले मागासलेपण, दारिद्रय वगैरे अनेक कारणांमुळे बालिका व बालकांना मजूरीसाठी जावे लागते. प्रस्तुत पाहणीतील बालक व बालिका  देखील मजूरी करतात. परंतू त्या पाठीमागची कारणे कोणती आहेत याच्या सहसंबंध पुढील तक्ता क्र. ७.१३ मध्ये स्पष्ट केले आहे.

**तक्ता क्र. ७.१३**

**बालक व बालिका कामगारांचे काम करण्याचे कारणाचे विश्लेषण**

**Relationship between Causes of Child Labour Work and Gender of Child Labour**

| बालकामगारांचे काम करण्याचे कारण | | लिंग | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | बालिका | बालक | |
| गरिबी | उत्तरदात्यांची संख्या | १३ | २९ | ४२ |
| | टक्केवारी | ५.०% | ११.२% | १६.२% |
| हालाखिची परिस्थिती | उत्तरदात्यांची संख्या | ५ | ८ | १३ |
| | टक्केवारी | १.९% | ३.१% | ५.०% |
| आई वारली | उत्तरदात्यांची संख्या | ४ | १ | ५ |
| | टक्केवारी | १.५% | ०.४% | १.९% |
| वडील वारले | उत्तरदात्यांची संख्या | १८ | २४ | ४२ |
| | टक्केवारी | ६.९% | ९.२% | १६.२% |
| आई वडील दोघे वारले | उत्तरदात्यांची संख्या | ३ | २ | ५ |
| | टक्केवारी | १.२% | ०.८% | १.९% |
| घरात खूप सदस्य आहेत | उत्तरदात्यांची संख्या | ९ | ३ | १२ |
| | टक्केवारी | ३.५% | १.२% | ४.६% |
| घरातील सदस्यांना कमी वेतन | उत्तरदात्यांची संख्या | २६ | २६ | ५२ |
| | टक्केवारी | १०.०% | १०.०% | २०.०% |
| घरातील सदस्य बेकार आहेत | उत्तरदात्यांची संख्या | २ | ५ | ७ |
| | टक्केवारी | ०.८% | १.९% | २.७% |
| शाळा सोडली म्हणून | उत्तरदात्यांची संख्या | २ | १ | ३ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | टक्केवारी | ०.८% | ०.४% | १.२% |
| वडीलांना काम नाही | उत्तरदात्यांची संख्या | ३ | ४ | ७ |
| | टक्केवारी | १.२% | १.५% | २.७% |
| रोज खर्चाला पैसे हवेत | उत्तरदात्यांची संख्या | १ | १४ | १५ |
| | टक्केवारी | ०.४% | ५.४% | ५.८% |
| शाळेत जावेसे वाटत नाही | उत्तरदात्यांची संख्या | ५ | ८ | १३ |
| | टक्केवारी | १.९% | ३.१% | ५.०% |
| वडीलांसोबत काम करतात | उत्तरदात्यांची संख्या | ० | ११ | ११ |
| | टक्केवारी | ०.०% | ४.२% | ४.२% |
| आईसोबत काम करतात | उत्तरदात्यांची संख्या | २६ | ० | २६ |
| | टक्केवारी | १०.०% | ०.०% | १०.०% |
| आईवडील कामाला जा म्हणतात | उत्तरदात्यांची संख्या | २ | ३ | ५ |
| | टक्केवारी | ०.८% | १.२% | १.९% |
| वडीलांना सिझनेबल काम आहे | उत्तरदात्यांची संख्या | १ | १ | २ |
| | टक्केवारी | ०.४% | ०.४% | ०.८% |
| एकूण | उत्तरदात्यांची संख्या | १२० | १४० | २६० |
| | टक्केवारी | ४६.२% | ५३.८% | १००.०% |

पुढील आलेखामध्ये बालक व बालिका कामगारांचे काम करण्याच्या कामाचे सहसंबंध दर्शविले आहे.

**आलेख क्र. ७.१३**

**बालक व बालिका कामगारांचे काम करण्याचे कारणाचे सहसंबंध**



वरील तक्ता क्र. ७.१३ मध्ये बालक व बालिका कामगारांचे काम करण्याचे कारणाचे विश्लेषण (सहसंबंध) दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये बालिका कामगारांचे प्रमाण ४६.२% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ५३.८% आहे. गरीबीमुळे काम करणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण ५.०% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ११.२% आहे. गरीबीमुळे काम करणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण कमी आहे तर बालक कामगारांचे प्रमाण जास्त आहे. हालाखिची परिस्थितीमुळे काम करणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण १.९% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ३.१% आहे. हालाखिच्या परिस्थितीमुळे काम करणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण कमी आहे तर बालक कामगारांचे प्रमाण जास्त आहे. आई वारली म्हणून काम करणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण १.५% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ०.४% आहे. आई वारली म्हणून काम करणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण जास्त आहे तर बालक कामगारांचे प्रमाण कमी आहे. वडील वारले म्हणून काम करणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण ६.९% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ९.२% आहे. वडील वारले म्हणून काम करणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण जास्त आहे तर बालक कामगारांचे प्रमाण कमी आहे. आईवडील वारल्यामुळे काम करणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण १.२% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ०.८% आहे. आईवडील वारले म्हणून काम करणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण जास्त आहे तर बालक कामगारांचे प्रमाण कमी आहे. घरात खूप सदस्य आहेत म्हणून काम करणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण ३.५% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण १.२% आहे. घरात खूप सदस्य आहेत म्हणून काम करणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण जास्त आहे तर बालक कामगारांचे प्रमाण कमी आहे. घरातील सदस्यांना कमी वेतन आहे म्हणून काम करणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण १०.०% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण १०.०% आहे. घरातील सदस्यांना कमी वेतन आहे म्हणून काम करणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे व बालक कामगारांचे प्रमाण समान आहे. घरातील सदस्य बेकार आहेत म्हणून काम करणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण ०.८% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण १.९% आहे. घरातील सदस्य बेकार आहेत म्हणून काम करणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण कमी आहे तर बालक कामगारांचे प्रमाण जास्त आहे. शाळा सोडली म्हणून काम करणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण ०.८% आहे तर बालक कामगारांचे

प्रमाण ०.४% आहे. शाळा सोडली म्हणून काम करणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण जास्त आहे तर बालक कामगारांचे प्रमाण कमी आहे. वडीलांना काम नाही म्हणून काम करणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण १.२% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण १.५% आहे. वडीलांना काम नाही म्हणून काम करणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण कमी आहे तर बालक कामगारांचे प्रमाण जास्त आहे. रोज खर्चाला पैसे हवेत म्हणून काम करणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण ०.४% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ५.४% आहे. रोज खर्चाला पैसे हवेत म्हणून काम करणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण कमी आहे तर बालक कामगारांचे प्रमाण जास्त आहे. शाळेत जावेसे वाटत नाही म्हणून काम करणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण १.९% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ३.१% आहे. शाळेत जावेसे वाटत नाही म्हणून काम करणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण कमी आहे तर बालक कामगारांचे प्रमाण जास्त आहे. वडीलांसोबत काम करणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण ०.०% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ४.२% आहे. वडीलांसोबत काम करणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण शुन्य आहे तर बालक कामगारांचे प्रमाण जास्त आहे. आईसोबत काम करणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण १०.०% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ०.०% आहे. आईसोबत काम करणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण जास्त आहे तर बालक कामगारांचे प्रमाण शुन्य आहे. आईवडील कामाला जा म्हणतात म्हणून काम करणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण ०.८% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण १.२% आहे. आईवडील कामाला जा म्हणतात म्हणून काम करणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण कमी आहे तर बालक कामगारांचे प्रमाण जास्त आहे. वडीलांना सिझनेबल काम आहे म्हणून काम करणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण ०.४% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ०.४% आहे. वडीलांना सिझनेबल काम आहे म्हणून काम करणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे व बालक कामगारांचे प्रमाण समान आहे.

## Chi – Square Tests

| Test | Value | df | Asymo.Sig (2 – Sided) |
|---|---|---|---|
| **Pearson Chi - Squre** | **62.396[a]** | **15** | **.000** |

गृहीतके : बालकामगारांचे काम करण्याचे कारण आणि बालकामगार मुलां–मुलींचे प्रमाण यांचासहसंबंध आहे.

**$H_0$** = सहसंबंध नाही.

**$H_1$** = सहसंबंध आहे.

स्पष्टीकरण :

सोलापूर शहरातील एकूण २६० बालकामगारांमध्ये १२० मुलींची संख्या आहे आणि १४० मुलांची संख्या आहे. परंतु बालकामगारामध्ये मुलां–मुलींची संख्या आणि त्यांचे काम करण्याचे कारण यांचा काही सहसंबंध आहे का? हे पाहणे महत्वाचे वाटते. हे तपासून पाहण्यासाठी **Chi – Square Tests**चा वापर केला आहे. त्यामध्ये **Level of Significance**हा ५% घेतला आहे, वरील गृहीतकासाठी **Degree of freedom (df)**हे १५ आहे. **Level of Significance** आणि **df** यांच्या साहाय्याने **Chi – Square Tests** ची **Table Value** ही २४.९९६ इतकी आहे. बालकामगारांच्या एकूण २६० प्रतिसादाच्या माध्यमातून प्राप्त झालेली **Chi – Square Tests** ची **computed Test Value** ही ६२.३९६ इतकी आहे. प्राप्त माहितीमध्ये **computed Chi – Square Test Value** ही **Table Value** पेक्षा अधिक असल्यामुळे गृहीतकातील **$H_0$** आपण नाकारतो आणि **$H_1$** चा स्विकार करतो. याचा अर्थ असा की, बालकामगारातील मुलांमुलींचे प्रमाण आणि त्यांचे काम करण्याचे कारण यांचा जवळचा संबंध आहे. घरातील गरीबी, दारिद्रय, वयस्क सदस्यांचे कमी वेतन, कुटूंबाचा मोठा आकार, घरातील वयस्कांची बेरोजगारी वगैरे परिस्थितीमुळे बालकामगारांचे प्रमाण अधिक आहे. याउलट घरची परिस्थिती चांगली असेल तर बालकामगार मुलांमुलींचे प्रमाण कमी दिसते. तक्त्यातील **SignificanceLevel** देखिल या सहसंबंधाला पुष्टी देतो. कारण त्यांची **Value** बरोबर .००० इतकी आहे.

### ७.१४ बालक व बालिका बालकामगार काम कसे करतात याचे विश्लेषण (सहसंबंध) :

वरील तक्त्यात बालक व बालिका कामगार कोणत्या स्वरुपाचे काम करतात हे पाहिले. परंतू ते कशा पद्धतीने काम करतात हे ही पाहणे महत्वाचे आहे. प्रस्तूत अध्ययनात जवळपास

७५ टक्के बालक व बालिका कामगार उभे राहून ८ ते १२ तास काम करतात. याचा अर्थ असा की बालकामगारांचे आरोग्य धोकादायक होऊ शकते. त्यासाठी बालक व बालिका कामगारांची काम करण्याची परिस्थिती पाहणे महत्वाचे आहे. पुढील तक्ता क्र. ७.१४ मध्ये बालक व बालिका कामगारांची काम करण्याची परिस्थितीचे सहसंबंध स्पष्ट केले आहे.

### तक्ता क्र. ७.१४

### बालक व बालिका बालकामगार काम कसे करतात याबाबतचे विश्लेषण

**Relationship between style of work and Gender of Child Labour**

| काम कसे करतात | | लिंग | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | बालिका | बालक | |
| बसून काम करतात | उत्तरदात्यांची संख्या | ४९ | १६ | ६५ |
| | टक्केवारी | १८.८% | ६.२% | २५.०% |
| उभे राहून काम करतात | उत्तरदात्यांची संख्या | ७१ | १२४ | १९५ |
| | टक्केवारी | २७.३% | ४७.७% | ७५.०% |
| एकूण | उत्तरदात्यांची संख्या | १२० | १४० | २६० |
| | टक्केवारी | ४६.२% | ५३.८% | १००.०% |

पुढील आलेखामध्ये बालक व बालिका कामगार काम कसे करतात याबाबतचे सहसंबंध दर्शविले आहे.

### आलेख क्र. ७.१४

### बालक व बालिका कामगार काम कसे करतात याबाबतचे सहसंबंध



वरील तक्ता क्र. ७.१४ मध्ये बालक व बालिका कामगार काम कसे करतात याचे विश्लेषण (सहसंबंध) दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये बालिका कामगारांचे प्रमाण ४६.२% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ५३.८% आहे. १८.८% बालिका कामगार हया बसून काम करतात तर ६.२% बालक कामगार बसून काम करतात. २७.३% बालिका कामगार हया उभे राहून काम करतात तर ४७.७% बालक कामगार हे उभे राहून काम करतात. उभे राहून काम करण्यामध्ये बालक कामगारांचे प्रमाण जास्त आहे. यावरुन हे लक्षात येते की, बसून काम करण्यापेक्षा उभे राहून काम करण्यामध्ये बालक व बालिका या दोघांचे प्रमाण जास्त आहे. ८ ते १२ तास निरंतर उभे राहून काम करणे हे या बालकामगारांच्या वयाला झेपणारे नाही. परंतू मजबूरीवश या बालक व बालिका कामगारांना अशा प्रकारचे काम करावे लागते. निरंतर उभे राहून करण्याने या बालकामगारांना आरोग्याच्या समस्या निर्माण होत आहेत. पाठीच्या कण्याचा त्रास, पाय दुखणे, अंग दुखणे वगैरे अनेक प्रकारचे समस्यांचा सामना करावा लागत आहे.

### ७.१५ बालक व बालिका कामगारांचा काम करण्याच्या कालावधीचे विश्लेषण (सहसंबंध) :

प्रस्तूत अध्ययनात बालक व बालिका कामगार हे १४ वर्षाच्या आतील आहेत. म्हणजेच बालकामगारांनी त्यांच्या कामाची सुरुवात देखिल अतिशय कमी वयात केलेली असेल. सदरील पाहणीतील बालक व बालिका कामगारांनी कामास सुरुवात करुन किती कालावधी झाला याचा शोध घेणे महत्वाचे ठरते. बालक व बालिका कामगारांनी कामाची सुरुवात केव्हापासून केली आहे याबाबतच्या तपशिलाचे वर्गीकरण पुढील तक्ता क्र. ७.१५ मध्ये स्पष्ट केले आहे.

**तक्ता क्र. ७.१५**

**बालक व बालिका कामगारांचे काम करण्याचा कालवधीचे विश्लेषण**

**Relationship between Duration of Child Labors Work and Gender of Child Labour**

| बालकामगारांच्या काम करण्याचा कालावधी | | लिंग | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | बालिका | बालक | |
| १ ते ६ महिने | उत्तरदात्यांची संख्या | १ | ३ | ४ |
| | टक्केवारी | ०.४% | १.२% | १.५% |
| ७ ते १२ महिने | उत्तरदात्यांची संख्या | २३ | १६ | ३९ |
| | टक्केवारी | ८.८% | ६.२% | १५.०% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ ते २ वर्ष | उत्तरदात्यांची संख्या | ३८ | ४९ | ८७ |
| | टक्केवारी | १४.६% | १८.८% | ३३.५% |
| २ ते ३ वर्ष | उत्तरदात्यांची संख्या | २३ | ३५ | ५८ |
| | टक्केवारी | ८.८% | १३.५% | २२.३% |
| ३ ते ४ वर्ष | उत्तरदात्यांची संख्या | २५ | ३० | ५५ |
| | टक्केवारी | ९.६% | ११.५% | २१.२% |
| ४ ते ५ वर्ष | उत्तरदात्यांची संख्या | ७ | ६ | १३ |
| | टक्केवारी | २.७% | २.३% | ५.०% |
| ५ ते ६ वर्ष | उत्तरदात्यांची संख्या | ३ | ० | ३ |
| | टक्केवारी | १.२% | ०.०% | १.२% |
| ६ ते ७ वर्ष | उत्तरदात्यांची संख्या | ० | १ | १ |
| | टक्केवारी | ०.०% | ०.४% | ०.४% |
| एकूण | उत्तरदात्यांची संख्या | १२० | १४० | २६० |
| | टक्केवारी | ४६.२% | ५३.८% | १००.०% |

पुढील आलेखामध्ये बालक व बालिका कामगारांच्या काम करण्याच्या कालावधीचे सहसंबंध दर्शविले आहे.

**आलेख क्र. ७.१५**

**बालक व बालिका कामगारांचे काम करण्याच्या कालावधीचे सहसंबंध**



वरील तक्ता क्र. ७.१५ मध्ये बालक व बालिका कामगारांचा काम करण्याच्या कालावधीचे विश्लेषण (सहसंबंध) दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये बालिका कामगारांचे प्रमाण ४६.२% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ५३.८% आहे. ०.४% बालिका कामगार हया १ ते ६ महिने झाले काम करत आहेत तर १.२% बालक कामगार हे १ ते ६ महिने झाले काम करत आहेत. ८.८% बालिका कामगार हे ७ ते १२ महिने झाले काम करत आहेत तर ६.२% बालक कामगार ७ ते १२ महिने झाले काम करत आहेत. १४.६% बालिका कामगार हया १ ते २ वर्ष झाले काम करत आहेत तर १८.८% बालक कामगार १ ते २ वर्ष झाले काम करत आहेत. ८.८% बालिका कामगार हया २ ते ३ वर्ष झाले काम करत आहेत तर १३.५% बालक कामगार २ ते ३ वर्ष झाले काम करत आहेत. ९.६% बालिका कामगार हया ३ ते ४ वर्ष झाले काम करत आहेत तर ११.५% बालक कामगार ३ ते ४ वर्ष झाले काम करत आहेत. २.७% बालिका कामगार हया ४ ते ५ वर्ष झाले काम करत आहेत तर २. ३% बालक कामगार हे ४ ते ५ वर्ष झाले काम करत आहेत. १.२% बालिका कामगार हया ५ ते ६ वर्ष झाले काम करत आहेत. ०.४% बालक कामगार ६ ते ७ वर्ष झाले काम करत आहेत. याचा अर्थ असा की, १ ते ४ वर्ष झाली काम करत असलेल्या बालकामगारांचे प्रमाण खूप जास्त आहे. इतक्या दिर्घ कालावधीपासून हे बालकामगार काम करत आहेत हे बाब कुटूंब, समाज व देशाच्या दृष्टीकोनातून अत्यंत गंभिर बाब आहे. इतका दिर्घ कालावधी आणि ते उभे राहून काम करणे म्हणजे हया बालकामगारांचे शारिरीक शोषण इतक्या काळापासून होत आहे हे लक्षात येते. यामुळे त्याचा शारिरीक विकास होण्यास बाधा उत्पन्न होत आहे.

### ७.१६ बालक व बालिका कामगारांचे कामाच्या तासाचे विश्लेषण (सहसंबंध) :

बालक व बालिका कामगारांच्या समस्यांचे अध्ययन करताना त्यांच्या काम करण्याच्या तासाबाबत अध्ययन करणे गरजेचे आहे. कारण बालकामगार अधिक तास काम करत असतील तर ते त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने धोक्याचा संकेत आहे. पुढील तक्ता क्र. ७.१६ मध्ये बालक व बालिका कामगारांच्या काम करण्याच्या तासांबाबत माहिती स्पष्ट केली आहे.

## तक्ता क्र. ७.१६

## बालक व बालिका कामगारांचे काम करण्याच्या तासाचे विश्लेषण

**Relationship between Working Hours of Child Labours and Gender of Child Labour**

| बालकामगारांचे काम करण्याचे तास | | लिंग | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | बालिका | बालक | |
| २ ते ४ तास | उत्तरदात्यांची संख्या | १ | १ | २ |
| | टक्केवारी | ०.४% | ०.४% | ०.८% |
| ५ ते ७ तास | उत्तरदात्यांची संख्या | ५९ | २९ | ८८ |
| | टक्केवारी | २२.७% | ११.२% | ३३.८% |
| ८ ते १० तास | उत्तरदात्यांची संख्या | ५९ | १०३ | १६२ |
| | टक्केवारी | २२.७% | ३९.६% | ६२.३% |
| ११ ते १२ तास | उत्तरदात्यांची संख्या | १ | ७ | ८ |
| | टक्केवारी | ०.४% | २.७% | ३.१% |
| एकूण | उत्तरदात्यांची संख्या | १२० | १४० | २६० |
| | टक्केवारी | ४६.२% | ५३.८% | १००.०% |

पुढील आलेखामध्ये बालक व बालिका कामगारांचे कामाच्या तासांचे सहसंबंध दर्शविले आहे.

## आलेख क्र. ७.१६
## बालक व बालिका कामगारांचे कामाच्या तासांचे सहसंबंध




वरील तक्ता क्र. ७.१६ मध्ये बालक व बालिका कामगारांचे कामाच्या तासाचे विश्लेषण (सहसंबंध) दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये बालिका कामगारांचे प्रमाण ४६.२% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ५३.८% इतके आहे. यामध्ये ०.४% बालिका

कामगार हया २ ते ४ तास काम करतात तर ०.४% बालक कामगार २ ते ४ तास काम करतात. २२.७% बालिका कामगार हया ५ ते ७ तास काम करतात तर ११.२% बालक कामगार ५ ते ७ तास काम करतात. २२.७% बालिका कामगार हया ८ ते १० तास काम करतात तर ३९.६% बालक कामगार ८ ते १० तास काम करतात. ०.४% बालिका कामगार हया ११ ते १२ तास काम करतात तर २.७% बालक कामगार ११ ते १२ तास काम करतात. याचा अर्थ असा की, ५ ते १२ तास करणाऱ्या बालकामगारांचे प्रमाण जास्त आहे. कामाच्या तासावरुन असे लक्षात येते की, या बालकामगारांना त्यांच्या वयाच्या मानाने अधिक तास परिश्रम करावे लागत आहे. इतके जास्त काम करुनही त्यांना मिळणारे वेतन हे खूप कमी आहे. म्हणजेच त्यांचे शारिरीक व आर्थिक शोषण होत आहे.

## Chi – Square Tests

| Test | Value | df | Asymo.Sig (2 – Sided) |
|---|---|---|---|
| **Pearson Chi – Squre** | **25.289[a]** | **3** | **.000** |

**गृहीतके : बालकामगारांचे कामाचे तास आणि बालकामगार मुलां – मुलींचे प्रमाण यांचासहसंबंध आहे.**

**$H_0$ = सहसंबंध नाही.**

**$H_1$ = सहसंबंध आहे.**

**स्पष्टीकरण :**

**सोलापूर शहरातील एकूण २६० बालकामगारांमध्ये १२० मुलींची संख्या आहे आणि १४० मुलांची संख्या आहे. परंतु बालकामगारामध्ये मुलां–मुलींची संख्या आणि त्यांच्या कामाचे तास यांचा काही सहसंबंध आहे का? हे पाहणे महत्वाचे वाटते. हे तपासून पाहण्यासाठी Chi – Square Testsचा वापर केला आहे. त्यामध्ये Level of Significanceहा ५% घेतला आहे, वरील गृहीतकासाठी Degree of freedom (df)हे ३ आहे. Level of Significance आणि df यांच्या साहाय्याने Chi – Square Tests ची Table Value ही ७.८१५ इतकी आहे. बालकामगारांच्या एकूण २६० प्रतिसादाच्या माध्यमातून प्राप्त झालेली Chi – Square Tests ची computed Test Value ही २५.२८९ इतकी आहे. प्राप्त माहितीमध्ये computed Chi – Square Test Value ही Table Value पेक्षा अधिक असल्यामुळे गृहीतकातील $H_0$ आपण नाकारतो आणि $H_1$ चा स्विकार करतो.**

**याचा अर्थ असा की, बालकामगारातील मुलांमुलींचे प्रमाण आणि त्यांना दिला जाणाऱ्या कमी मोबदल्यात त्यांच्याकडून जास्त तास काम करुन घेता येते. याउलट वयस्क व्यक्तींना जास्त मोबदला व तुलनेने कमी तास काम करतात. जास्त तास काम करत असल्यामुळे जास्त बालकामगारांना कामावर ठेवले जाते. तक्त्यातील SignificanceLevel देखिल या सहसंबंधाला पुष्टी देतो. कारण त्यांची Value बरोबर .००० इतकी आहे.**

## ७.१७ बालक व बालिका कामगारांना काम करताना विश्रांती मिळते का नाही याबाबतचे विश्लेषण (सहसंबंध) :

अनौपचारिक क्षेत्रात विविध नोकरी, उद्योग तथा विविध व्यवसायांमध्ये काम करणाऱ्या बालकामगारांसाठी दररोजच्या भोजनासाठी विश्रांतीची वेळ निश्चित नसते किंवा विश्रांतीसाठी मध्यांतर मिळतेच याची शक्यता कमी असते. कारण, बालक व बालिका कामगारांच्या बाबतीत मध्यांतर विश्रांतीची वेळ त्यांचे काम, व्यवसायाचा प्रकार, नोकरी अथवा कामाचे स्वरुप आणि कामाचे तास यावर साधारणत: अवलंबून असते. बालक व बालिका कामगारांना काम करीत असताना मध्यांतर विश्रांतीसाठी वेळ मिळतो का? याबाबतचे वर्गीकरण पुढील तक्ता क्र. ७.१७ मध्ये स्पष्ट केले आहे.

### तक्ता क्र. ७.१७

### बालक व बालिका कामगारांना काम करताना विश्रांती मिळते किंवा नाही याबाबतचे विश्लेषण

**Relationship between Resting time and Gender of Child Labour**

| बालकामगारांना विश्रांती मिळते किंवा नाही | | लिंग | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | बालिका | बालक | |
| विश्रांती मिळते | उत्तरदात्यांची संख्या | २२ | १९ | ४१ |
| | टक्केवारी | ८.५% | ७.३% | १५.८% |
| विश्रांती मिळत नाही | उत्तरदात्यांची संख्या | ९८ | १२१ | २१९ |
| | टक्केवारी | ३७.७% | ४६.५% | ८४.२% |
| एकूण | उत्तरदात्यांची संख्या | १२० | १४० | २६० |
| | टक्केवारी | ४६.२% | ५३.८% | १००.०% |

पुढील आलेखामध्ये बालक व बालिका कामगारांना काम करताना विश्रांती मिळते का नाही याबाबतचे सहसंबंध दर्शविले आहे.

### आलेख क्र. ७.१७

### बालक व बालिका कामगारांना काम करताना विश्रांती मिळते किंवा नाही याबाबतचे सहसंबंध




वरील तक्ता क्र. ७.१७ मध्ये बालक व बालिका कामगारांना काम करताना विश्रांती मिळते का नाही याबाबतचे विश्लेषण (सहसंबंध) दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये बालिका कामगारांचे प्रमाण ४६.२% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ५३.८% आहे. ८.५% बालिका कामगारांना काम करताना विश्रांती मिळते तर ७.३% बालक कामगारांना काम करताना विश्रांती मिळते. त्याचप्रमाणे ३७.७% बालिका कामगारांना काम करताना विश्रांती मिळत नाही तर ४६.५% बालक कामगारांना काम करताना विश्रांती मिळत नाही. कोणत्याही कामगारांना काम करताना मध्यांतर मिळणे आवश्यक आहे. संघटीत क्षेत्रात प्रत्येक कामगारांना काम करताना मध्यांतर मिळतो परंतू बालकामगार हे असंघटीत क्षेत्रात काम करत असल्यामुळे त्यांना कामाच्या वेळेत मध्यांतर मिळत नाही आणि मालकवर्ग या गोष्टीकडे गांभिर्याने पाहत नाही. बालकामगारांना सुद्धा याबाबत माहिती नसते की, संघटीत क्षेत्रात मध्यांतर दिला जातो. याबाबत ते आवाजही उठवू शकत नाही कारण काम करणे त्यांची मजबूरी असते याचा फायदा मालक वर्ग घेतात. कामाच्या वेळेत मध्यांतर मिळणे आवश्यक असते. बालकामगार हे ५ ते १० तास

निरंतर काम केल्यामुळे विश्रांतीची गरज भासते परंतू विश्रांती मिळत नसल्यामुळे बालकामगारांच्या आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होतो.

### ७.१८ बालक व बालिका कामगारांना मिळणाऱ्या विश्रांतीच्या कालावधीचे विश्लेषण (सहसंबंध) :

बालक व बालिका कामगारांना काम करताना विश्रांती मिळते का नाही हे पाहिल्यानंतर बालक व बालिका कामगारांना किती विश्रांती मिळते ते पाहणे आवश्यक आहे. पुढील तक्ता क्र. ७.१८ मध्ये बालक व बालिका कामगारांना काम करताना मिळणाऱ्या विश्रांतीच्या कालावधी स्पष्ट केले आहे.

**तक्ता क्र. ७.१८**

**बालक व बालिका कामगारांना काम करताना मिळणाऱ्या विश्रांतीचा कालावधीचे विश्लेषण**

**Relationship between Relaxation Time and Gender of Child Labour**

| विश्रांतीचा कालावधी | | लिंग | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | बलिका | बालक | |
| विश्रांती मिळत नाही | उत्तरदात्यांची संख्या | १२ | ९ | २१ |
| | टक्केवारी | २९.३% | २२.०% | ५१.२% |
| १ तासांपर्यत | उत्तरदात्यांची संख्या | १० | ९ | १९ |
| | टक्केवारी | २४.४% | २२.०% | ४६.३% |
| १ ते २ तासांपर्यत | उत्तरदात्यांची संख्या | ० | १ | १ |
| | टक्केवारी | ०.०% | २.४% | २.४% |
| एकूण | उत्तरदात्यांची संख्या | २२ | १९ | ४१ |
| | टक्केवारी | ५३.७% | ४६.३% | १००.०% |

पुढील आलेखामध्ये बालक व बालिका कामगारांना काम करताना मिळणाऱ्या विश्रांतीच्या कालावधीबाबतचे सहसंबंध दर्शविले आहे.

**आलेख क्र. ७.१८**

**बालक व बालिका कामगारांना काम करताना मिळणाऱ्या विश्रांतीच्या कालावधीबाबतचे सहसंबंध**




वरील तक्ता क्र. ७.१८ मध्ये बालक व बालिका कामगारांना मिळणाऱ्या विश्रांतीच्या कालावधीचे विश्लेषण (सहसंबंध) दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये बालिका कामगारांचे प्रमाण ५३.७% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ४६.३% आहे. ज्या बालकामगारांना विश्रांती मिळते त्यापैकी २४.४% बालिका कामगारांना १ तासापर्यतच्या दरम्यानची विश्रांती मिळते तर २२.०% बालक कामगारांना १ तासापर्यंतच्या दरम्यानची विश्रांती मिळते. २.४% बालक कामगारांना १ ते २ तासांपर्यंतच्या दरम्यानची विश्रांती मिळते तर बालिका कामगारांना १ ते २ तासापर्यंतची विश्रांती मिळत नाही.

**७.१९ बालक व बालिका कामगारांच्या मालकांच्या वर्तनाची पातळीचे विश्लेषण (सहसंबंध) :**

पुढील तक्ता क्र. ७.१९ मध्ये बालक व बालिका कामगारांसोबत मालकांच्या वर्तनाच्या पातळीचे सहसंबंध स्पष्ट केले आहे.

## तक्ता क्र. ७.१९

## बालक व बालिका कामगारांचे मालकांची वर्तनाची पातळीचे विश्लेषण

**Relationship between Level of Behavior of Owners and Gender of Child Labour**

| बालकामगारांच्या मालकांच्या वर्तनाची पातळी | | लिंग | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | बलिका | बालक | |
| मारतात | उत्तरदात्यांची संख्या | २० | ३२ | ५२ |
| | टक्केवारी | ७.७% | १२.३% | २०.०% |
| प्रेमाने | उत्तरदात्यांची संख्या | १० | १३ | २३ |
| | टक्केवारी | ३.८% | ५.०% | ८.८% |
| सामान्य | उत्तरदात्यांची संख्या | ९० | ९५ | १८५ |
| | टक्केवारी | ३४.६% | ३६.५% | ७१.२% |
| एकूण | उत्तरदात्यांची संख्या | १२० | १४० | २६० |
| | टक्केवारी | ४६.२% | ५३.८% | १००.०% |

पुढील आलेखामध्ये बालक व बालिका कामगारांच्या मालकांच्या वर्तनाच्या पातळीचे सहसंबंध दर्शविले आहे.

## आलेख क्र. ७.१९

## बालक व बालिका कामगारांच्या मालकांच्या वर्तनाच्या पातळीचे सहसंबंध




वरील तक्ता क्र. ७.१९ मध्ये बालक व बालिका कामगारांच्या मालकांच्या वर्तनाची पातळीचे विश्लेषण (सहसंबंध) दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये बालिका

कामगारांचे प्रमाण ४६.२% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ५३.८% आहे. ७.७% बालिका कामगारांना मालक मारत असतात तर १२.३% बालक कामगारांना मालक मारत असतात. बालकामगारांना मारण्याच्या प्रमाणात बालक कामगारांचे प्रमाण जास्त आहे. ३.८% बालिका सोबत प्रेमाने वागतात तर ५.०% बालक कामगारांसोबत प्रेमाने वागतात. मालकाचे वर्तन प्रेमाने असणाऱ्या बालकामगारांमध्ये बालक कामगारांचे प्रमाण जास्त आहे. ३४.६% बालिका कामगारांसोबत मालकांचे वर्तन सामान्य आहे तर ३६.५% बालक कामगारांसोबत मालकांचे वर्तन सामान्य आहे.

## ७.२० बालक व बालिका कामगारांचे मालकांच्या वर्तनाचे विश्लेषण (सहसंबंध) :

प्रस्तुत विषयाचे अध्ययन करताना मालक वर्गाकडून बालक व बालिका कामगारांना कशा पद्धतीची वागणूक मिळते. हे अभ्यासण्यासाठी मालकांचे बालक व बालिका कामगारांच्या बाबतीतच्या वर्तन पाहणे आवश्यक आहे. पुढील तक्ता क्र. ७.२० मध्ये बालक व बालिका कामगारांसोबत मालकांच्या वर्तनाचे सहसंबंध स्पष्ट केले आहे.

**तक्ता क्र. ७.२०**

**बालक व बालिका कामगारांचे मालकांचे वर्तनाचे विश्लेषण**

**Relationship between Behavior of owners and Gender of Child Labour**

| बालकामगारांचे मालकांचे वर्तन | | लिंग | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | बालिका | बालक | |
| मध्यम | उत्तरदात्यांची संख्या | ९३ | ९५ | १८८ |
| | टक्केवारी | ३५.८% | ३६.५% | ७२.३% |
| कठोर | उत्तरदात्यांची संख्या | १ | ० | १ |
| | टक्केवारी | ०.४% | ०.०% | ०.४% |
| प्रेमाने | उत्तरदात्यांची संख्या | १० | १४ | २४ |
| | टक्केवारी | ३.८% | ५.४% | ९.२% |
| अशिष्ट वर्तन | उत्तरदात्यांची संख्या | १६ | ३१ | ४७ |
| | टक्केवारी | ६.२% | ११.९% | १८.१% |
| एकूण | उत्तरदात्यांची संख्या | १२० | १४० | २६० |
| | टक्केवारी | ४६.२% | ५३.८% | १००.०% |

पुढील आलेखामध्ये बालक व बालिका कामगारांचे मालकांच्या वर्तनाचे सहसंबंध दर्शविले आहे.

### आलेख क्र. ७.२०

### बालक व बालिका कामगारांच्या मालकांचे वर्तनाचे सहसंबंध




वरील तक्ता क्र. ७.२० मध्ये बालक व बालिका कामगारांचे मालकांच्या वर्तनाचे विश्लेषण (सहसंबंध) दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये बालिका कामगारांचे प्रमाण ४६.२% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ५३.८% आहे. मालकांचे मध्यम वर्तन असणाऱ्या बालिका कामगारांचे प्रमाण ३५.८% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ३५.५% आहे. म्हणजेच बालिका कामगारांचे प्रमाण जास्त आहे तर बालक कामगारांचे प्रमाण कमी आहे. मालकाचे वर्तन कठोर असणाऱ्या बालिका कामगारांचे प्रमाण ०.४% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ०.०% आहे. म्हणजेच बालिका कामगारांचे प्रमाण जास्त आहे तर बालक

कामगारांचे प्रमाण शुन्य आहे. मालकाचे वर्तन प्रेमाचे असणाऱ्या बालिका कामगारांचे प्रमाण ३.८% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ५.४% आहे. म्हणजेच बालिका कामगारांचे प्रमाण कमी आहे तर बालक कामगारांचे प्रमाण जास्त आहे. मालकांचे वर्तन अशिष्ट असणाऱ्या बालिकांचे प्रमाण ६.२% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ११.९% आहे. म्हणजेच बालिका कामगारांचे प्रमाण कमी आहे तर बालक कामगारांचे प्रमाण जास्त आहे. याचा अर्थ बालक व बालिका कामगारांचे मानसिक व शारिरीक शोषण होत आहे.

## ७.२१ बालक व बालिका कामगार त्यांच्या कामाबाबत समाधानी आहेत किंवा नाही याचे विश्लेषण (सहसंबंध) :

बालक व बालिका कामगारांना कराव्या लागणाऱ्या श्रमाबाबत स्वत: बालक व बालिका मजूरांचे मत काय आहे, ते आपल्या कामाबाबत संतुष्ट आहेत का. हे पाहणे महत्वाचे आहे. पुढील तक्ता क्र. ७.२१ मध्ये बालक व बालिका कामगारांची आपल्या कामाबाबतची संतुष्टीबाबतचे सहसंबंध स्पष्ट केली आहे.

**तक्ता क्र. ७.२१**

**बालक व बालिका कामगार कामाच्या बाबत समाधानी आहेत किंवा नाही याचे विश्लेषण**

**Relationship between Satisfaction about work of Child Labour and Gender of Child Labour**

| बालकामगार कामाबाबत समाधानी आहेत किंवा नाही | | लिंग | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | बालिका | बालक | |
| समाधानी आहेत | उत्तरदात्यांची संख्या | ३० | ५७ | ८७ |
| | टक्केवारी | ११.५% | २१.९% | ३३.५% |
| समाधानी नाहीत | उत्तरदात्यांची संख्या | ९० | ८३ | १७३ |
| | टक्केवारी | ३४.६% | ३१.९% | ६६.५% |
| एकूण | उत्तरदात्यांची संख्या | १२० | १४० | २६० |
| | टक्केवारी | ४६.२% | ५३.८% | १००.०% |

पुढील आलेखामध्ये बालक व बालिका कामगार त्यांच्या कामाबाबत समाधानी आहेत किंवा नाही याबाबतचे सहसंबंध दर्शविले आहे.

## आलेख क्र. ७.२१

### बालक व बालिका कामगार त्यांच्या कामाबाबत समाधानी आहेत किंवा नाही याबाबतचे सहसंबंध




वरील तक्ता क्र. ७.२१ मध्ये बालक व बालिका कामगार त्यांच्या कामाबाबत समाधानी आहेत किंवा नाही याचे विश्लेषण (सहसंबंध) दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये बालिका कामगारांचे प्रमाण ४६.२% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ५३.८% आहे. कामाच्या बाबतीत समाधानी असलेल्या बालिका कामगारांचे प्रमाण ११.५% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण २१.९% आहे. म्हणजेच कामाच्या बाबतीत समाधानी असलेल्या बालकामगारांमध्ये बालिका कामगारांचे प्रमाण कमी आहे. तसेच कामाच्या बाबतीत समाधानी नसलेल्या बालिका कामगारांचे प्रमाण ३४.६% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ३१.९% आहे. म्हणजेच कामाच्या बाबतीत समाधानी नसल्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण जास्त आहे. यावरुन असे लक्षात येते बालिका कामगार या आपल्या कामाबाबत असमाधानी आहेत. तथ्य संकलनाच्या वेळी बऱ्याच बालिका कामगारांनी शाळेत जावेसे वाटते शिक्षण घ्यावेसे वाटते अशी इच्छा व्यक्त केली होती. याचाच अर्थ बहूतांशी बालिका कामगार हया मजबूरीने काम करत आहेत.

## Chi – Square Tests

| Test | Value | df | Asymo.Sig (2 – Sided) |
|---|---|---|---|
| Pearson Chi – Squre | 7.166[a] | 1 | 0.007 |

गृहीतके : बालकामगारांची त्यांच्या कामाबाबतची संतुष्टी आणि बालकामगार मुलां – मुलींचे प्रमाण यांचासहसंबंध आहे.

$H_0$ = सहसंबंध नाही.

$H_1$ = सहसंबंध आहे.

स्पष्टीकरण :

सोलापूर शहरातील एकूण २६० बालकामगारांमध्ये १२० मुलींची संख्या आहे आणि १४० मुलांची संख्या आहे. परंतु बालकामगारामध्ये मुलां–मुलींची संख्या आणि त्यांच्या कामाबाबतची संतुष्टी यांचा काही सहसंबंध आहे का? हे पाहणे महत्वाचे वाटते. हे तपासून पाहण्यासाठी **Chi – Square Tests**चा वापर केला आहे. त्यामध्ये **Level of Significance**हा ५% घेतला आहे, वरील गृहीतकासाठी **Degree of freedom (df)**हे १ आहे. **Level of Significance** आणि **df** यांच्या साहाय्याने **Chi – Square Tests** ची **Table Value** ही ३.८४१ इतकी आहे. बालकामगारांच्या एकूण २६० प्रतिसादाच्या माध्यमातून प्राप्त झालेली **Chi – Square Tests** ची **computed Test Value** ही ७.१६६ इतकी आहे. प्राप्त माहितीमध्ये **computed Chi – Square Test Value** ही **Table Value** पेक्षा अधिक असल्यामुळे गृहीतकातील $H_0$ आपण नाकारतो आणि $H_1$ चा स्विकार करतो. याचा अर्थ असा की, बालकामगारातील मुलांमुलींचे प्रमाण आणि त्यांच्या कामाबाबतची संतुष्टी यांचा जवळचा संबंध आहे. अधिकांशी बालकामगार हे आपल्या कामाबाबत संतुष्ट नाहीत म्हणजेच एकतर त्यांना मजबुरीने काम करावे लागत आहे आणि दुसरे म्हणजे कुटूंबातील इतर व्यक्तींचे कमी वेतन, बेरोजगारी यामुळे बालकामगार मुलांमुलींना काम करावे लागत आहे. तक्त्यातील **SignificanceLevel** देखिल या सहसंबंधाला पुष्टी देतो. कारण त्यांची **Value** बरोबर .००७ इतकी आहे.

## ७.२२ बालक व बालिका बालकामगारांचे त्यांच्या कामाबाबतचे मत याचे विश्लेषण (सहसंबंध)

बालक व बालिका कामगारांना श्रमाच्या बाजारात पाठवून दिले जाते. ते मजबूरीने किंवा स्वत: घेतलेल्या निर्णयामुळे असू शकते. बालक व बालिका कामगार काम करतात परंतू त्यांना कराव्या लागणाऱ्या कामाच्या प्रती स्वत: बालक व बालिका कामगारांची मनीषा काय आहे त्याचा सहसंबंध पुढील तक्ता क्र. ७.२२ मध्ये स्पष्ट केले आहे.

### विश्लेय तक्ता क्र. ७.२२

### बालक व बालिका बालकामगारांचे कामाबाबत मत ाबाबतचेषण

**Relationship between opinion regarding Work and Gender of Child Labour**

| बालकामगाराचे कामाबाबतचे मत | | लिंग | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | बालिका | बालक | |
| जे काम करत आहे तेच पुढेही करावेसे वाटते | उत्तरदात्यांची संख्या | ४१ | ५९ | १०० |
| | टक्केवारी | १५.८% | २२.७% | ३८.५% |
| याही पेक्षा चांगले काम करावेसे वाटते | उत्तरदात्यांची संख्या | २५ | ४२ | ६७ |
| | टक्केवारी | ९.६% | १६.२% | २५.८% |
| शिक्षण घ्यावेसे वाटते | उत्तरदात्यांची संख्या | ४९ | २२ | ७१ |
| | टक्केवारी | १८.८% | ८.५% | २७.३% |
| दुसरे वेगळे काम करावेसे वाटते | उत्तरदात्यांची संख्या | ५ | १७ | २२ |
| | टक्केवारी | १.९% | ६.५% | ८.५% |
| एकूण | उत्तरदात्यांची संख्या | १२० | १४० | २६० |
| | टक्केवारी | ४६.२% | ५३.८% | १००.०% |

पुढील आलेखामध्ये बालक व बालिका कामगारांचे त्यांच्या कामाबाबतचे मत याबाबतचे सहसंबंध दर्शविले आहे.

### आलेख क्र. ७.२२

### बालक व बालिका कामगारांचे त्यांच्या कामाबाबतच्या मतांचे सहसंबंध




वरील तक्ता क्र. ७.२२ मध्ये बालक व बालिका कामगारांचे त्यांच्या कामाबाबतचे मत याचे विश्लेषण (सहसंबंध) दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये बालिका कामगारांचे प्रमाण ४६.२% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ५३.८% आहे. जे काम आहे तेच पुढेही करावेसे वाटते असे मत असणाऱ्या बालिका कामगारांचे प्रमाण १५.८% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण २२.७% आहे. जे काम आहे तेच पुढेही करावेसे वाटते असे मत असणाऱ्या बालिका कामगारांचे प्रमाण कमी आहे तर बालक कामगारांचे प्रमाण जास्त आहे. याही पेक्षा चांगले काम करावेसे वाटते असे मत असणाऱ्या बालिका कामगारांचे प्रमाण ९.६% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण १६.२% आहे. याही पेक्षा चांगले काम करावेसे वाटते असे मत असणाऱ्या बालिका कामगारांचे प्रमाण कमी आहे तर बालक कामगारांचे प्रमाण जास्त आहे. शिक्षण घ्यावेसे वाटते असे मत असणाऱ्या बालिका कामगारांचे प्रमाण १८.८% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ८.५% आहे. शिक्षण घ्यावेसे वाटते असे मत असणाऱ्या बालिका कामगारांचे प्रमाण जास्त आहे तर बालक कामगारांचे प्रमाण कमी आहे. दुसरे वेगळे काम करावेसे वाटते असे मत असणाऱ्या बालिका कामगारांचे प्रमाण १.९% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ६.५% आहे. दुसरे वेगळे काम करावेसे वाटते असे मत असणाऱ्या बालिका कामगारांचे प्रमाण कमी आहे तर बालक कामगारांचे प्रमाण जास्त आहे.

वरील विश्लेषणावरुन असे लक्षात येते की, बहूतांशी बालिका कामगारांना शिक्षण घ्यावेसे वाटते. तर बालक कामगारांचे जे काम आहे तेच पुढेही करावेसे वाटते असे मत आहे.

## ७.२३ बालक व बालिका कामगारांना मिळणाऱ्या फावल्या वेळेच्या उपयोगाचे विश्लेषण (सहसंबंध) :

बालक व बालिका कामगारांना ८—१० तास काम करावे लागते. काम करुन आल्यानंतर जो फावला वेळ मिळतो त्या वेळेत ते काय करतात हे पाहणे आवश्यक आहे. सदरील पाहणीत असे आढळून आले आहे की, बहूतांशी बालिका कामगारांना कामावरुन आल्यानंतरही घरी जेवण बनविणे किंवा घरकामात मदत करण्याचे काम करावे लागते. पुढील तक्ता क्र. ७. २३ मध्ये बालक व बालिका कामगारांना मिळणाऱ्या फावल्या वेळेचा उपयोगाचा सहसंबंध स्पष्ट केला आहे.

**तक्ता क्र. ७.२३**

**बालक व बालिका कामगारांना मिळणाऱ्या फावल्या वेळेचा उपयोगाचे विश्लेषण**

**Relationship between Utilizations of Time and Gender of Child Labour**

| बालकामगारांना मिळणाऱ्या फावल्या वेळेचा उपयोग | | लिंग | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | बालिका | बालक | |
| लिहीत वाचत असतात | उत्तरदात्यांची संख्या | २० | १० | ३० |
| | टक्केवारी | ७.७% | ३.८% | ११.५% |
| खेळतात | उत्तरदात्यांची संख्या | २७ | ५० | ७७ |
| | टक्केवारी | १०.४% | १९.२% | २९.६% |
| जेवण बनविण्याचे काम करतात | उत्तरदात्यांची संख्या | ३० | २ | ३२ |
| | टक्केवारी | ११.५% | ०.८% | १२.३% |
| टी.व्ही. पाहत असतात | उत्तरदात्यांची संख्या | १५ | २३ | ३८ |
| | टक्केवारी | ५.८% | ८.८% | १४.६% |
| काही नाही करत | उत्तरदात्यांची संख्या | २८ | ५५ | ८३ |
| | टक्केवारी | १०.८% | २१.२% | ३१.९% |
| एकूण | उत्तरदात्यांची संख्या | १२० | १४० | २६० |
| | टक्केवारी | ४६.२% | ५३.८% | १००.०% |

पुढील आलेखामध्ये बालक व बालिका कामगारांना मिळणाऱ्या फावल्या वेळेच्या उपयोगाचे सहसंबंध दर्शविले आहे.

### आलेख क्र. ७.२३

### बालक व बालिका कामगारांना मिळणाऱ्या फावल्या वेळेच्या उपयोगाचे सहसंबंध




वरील तक्ता क्र. ७.२३ मध्ये बालक व बालिका कामगारांना मिळणाऱ्या फावल्या वेळेच्या उपयोगाचे विश्लेषण (सहसंबंध) दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये बालिका कामगारांचे प्रमाण ४६.२% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ५३.८% आहे. फावल्या वेळेत लिहीत वाचत असणाऱ्या बालिका कामगारांचे प्रमाण ७.७% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ३.८% आहे. फावल्या वेळेत लिहीत वाचत असणाऱ्या बालिका कामगारांचे प्रमाण जास्त आहे तर बालक कामगारांचे प्रमाण कमी आहे. फावल्या वेळेत खेळत असणाऱ्या बालिका कामगारांचे प्रमाण १०.४% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण १९.२% आहे. फावल्या वेळेत खेळत असणाऱ्या बालिका कामगारांचे प्रमाण कमी आहे तर बालक कामगारांचे प्रमाण जास्त आहे. फावल्या वेळेत जेवण बनवत असणाऱ्या बालिका कामगारांचे प्रमाण ११.५% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ०.८% आहे. फावल्या वेळेत जेवण बनवत असणाऱ्या बालिका कामगारांचे प्रमाण जास्त आहे तर बालक कामगारांचे प्रमाण कमी आहे. फावल्या वेळेत टि.व्ही पाहत असणाऱ्या बालिका कामगारांचे प्रमाण ५.८% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ८.८% आहे. फावल्या वेळेत टि.व्ही. पाहत असणाऱ्या बालिका कामगारांचे प्रमाण कमी आहे तर बालक

कामगारांचे प्रमाण जास्त आहे. फावल्या वेळेत काही करत नसणाऱ्या बालिका कामगारांचे प्रमाण १०.८% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण २१.२% आहे. फावल्या वेळेत काही करत नसणाऱ्या बालिका कामगारांचे प्रमाण कमी आहे तर बालक कामगारांचे प्रमाण जास्त आहे.

वरील विश्लेषणावरुन असे लक्षात येते की, लिहित वाचत असणाऱ्यामध्ये, घरी जेवण बनविणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण जास्त आहे. याचा अर्थ बालिका कामगारांना शिक्षणाची आवड आहे परंतू ते कामामुळे शिक्षण घेऊ शकत नाही. त्याचप्रमाणे आपल्या समाजात मुलांनाही घरची कामे, जेवण बनविण्याचे काम यायला पाहिजे म्हणून बालिका कामगारांना बाहेर काम करुन आल्यानंतर घरातील कामही करावे लागते. यावरुन असे समजते की बालिका कामगारांची परिस्थिती अत्यंत बिकट आहे आणि ही विचार करण्याची बाब आहे.

### ७.२४ बालक व बालिका बालकामगारांचे महत्वाकांक्षा/ध्येय याबाबतचे विश्लेषण (सहसंबंध) :

ध्येयाबाबत विचारण्यात आले असता काही बालक व बालिका कामगारांनी चांगली उत्तरे दिली की त्यांना मोठा व्यक्ती बनायचे आहे, शिक्षक, पोलिस, डॉक्टर व्हायचे आहे. तसेच काही बालक कामगार हॉटेल, ढाबा, चायनिज गाडी वगैरे ठिकाणी काम करतात. त्यांना विचारले असता त्यांनाही त्यांच्या मालकासारखे हॉटेलचा मालक व्हायचे आहे असे सांगण्यात आले. काहींनी काही प्रतिक्रिया दिली नाही. पुढील तक्ता क्र. ७.२४ मध्ये बालक व बालिका कामगारांचे ध्येय याबाबतचा सहसंबंध स्पष्ट केले आहे.

**तक्ता क्र. ७.२४**

**बालक व बालिका बालकामगारांचे ध्येय/महत्वाकांक्षाचे विश्लेषण**

**Relationship between Ambition of Child Labour and Gender of Child Labour**

| बालकामगारांचे ध्येय/महत्वाकांक्षा | | लिंग | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | बालिका | बालक | |
| पोलिस | उत्तरदात्यांची संख्या | २ | ० | २ |
| | टक्केवारी | ०.८% | ०.०% | ०.८% |
| शिक्षक | उत्तरदात्यांची संख्या | ८ | ० | ८ |
| | टक्केवारी | ३.१% | ०.०% | ३.१% |
| डॉक्टर | उत्तरदात्यांची संख्या | ४ | ० | ४ |
| | टक्केवारी | १.५% | ०.०% | १.५% |
| हॉटेलचा | उत्तरदात्यांची संख्या | १ | १९ | २० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| मालक | टक्केवारी | ०.४% | ७.३% | ७.७% |
| मोठा व्यक्ती बनायचे आहे | उत्तरदात्यांची संख्या | १४ | ९ | २३ |
| | टक्केवारी | ५.४% | ३.५% | ८.९% |
| माहित नाही | उत्तरदात्यांची संख्या | ९१ | १११ | २०२ |
| | टक्केवारी | ३५.१% | ४२.९% | ७८.०% |
| एकूण | उत्तरदात्यांची संख्या | १२० | १३९ | २५९ |
| | टक्केवारी | ४६.३% | ५३.७% | १००.०% |

पुढील आलेखामध्ये बालक व बालिका कामगारांचे महत्वाकांक्षा/ध्येय याबाबतचे सहसंबंध दर्शविले आहे.

**आलेख क्र. ७.२४**

**बालक व बालिका कामगारांचे महत्वाकांक्षा/ध्येय याबाबतचे सहसंबंध**




वरील तक्ता क्र. ७.२४ मध्ये बालक व बालिका कामगारांचे महत्वाकांक्षा/ध्येय याबाबतचे विश्लेषण (सहसंबंध) दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये बालिका कामगारांचे प्रमाण ४६.३% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ५३.७% आहे. पोलिस बनण्याचे ध्येय असणाऱ्या बालिका कामगारांचे प्रमाण ०.८% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ०.०% आहे. पोलिस बनण्याचे ध्येय असणाऱ्या बालिका कामगारांचे प्रमाण जास्त आहे तर बालक कामगारांचे प्रमाण कमी आहे. शिक्षक बनण्याचे ध्येय असणाऱ्या बालिका

कामगारांचे प्रमाण ३.८% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ०.०% आहे. शिक्षक बनण्याचे ध्येय असणाऱ्या बालिका कामगारांचे प्रमाण जास्त आहे तर बालक कामगारांचे प्रमाण शुन्य आहे. डॉक्टर बनण्याचे ध्येय असणाऱ्या बालिका कामगारांचे प्रमाण १.५% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ०.०% आहे. डॉक्टर बनण्याचे ध्येय असणाऱ्या बालिका कामगारांचे प्रमाण जास्त आहे तर बालक कामगारांचे प्रमाण शुन्य आहे. हॉटेलचा मालक बनण्याचे ध्येय असणाऱ्या बालिका कामगारांचे प्रमाण ०.४% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ७.३% आहे. हॉटेलचा मालक बनण्याचे ध्येय असणाऱ्या बालिका कामगारांचे प्रमाण कमी आहे तर बालक कामगारांचे प्रमाण जास्त आहे. मोठा व्यक्ती बनण्याचे ध्येय असणाऱ्या बालिका कामगारांचे प्रमाण ५.४ आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ३.४% आहे. मोठा व्यक्ती बनण्याचे ध्येय असणाऱ्या बालिका कामगारांचे प्रमाण जास्त आहे तर बालक कामगारांचे प्रमाण कमी आहे. आपले ध्येय आहे हे माहित नसणाऱ्या बालिका कामगारांचे प्रमाण ३५.१% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ४२.९% आहे. आपले ध्येय आहे हे माहित नसणाऱ्या बालिका कामगारांचे प्रमाण कमी आहे तर बालक कामगारांचे प्रमाण जास्त आहे.

वरील विश्लेषणावरुन असे लक्षात येते की, बालिका कामगारांचे ध्येय खूप चांगले आहे. त्यांना शिकून काहीतरी बनावयाचे आहे. परंतू शिक्षणापासून वंचित राहिल्याने त्यांचे हे ध्येय पुर्ण होऊ शकत नाही. त्यामुळे या बालकामगारांच्या शिक्षणाच्या बाबतीत गांभिर्याने पहावयास हवे. या सर्व बालकामगारांना शिक्षण कसे मिळेल यासाठी उपाययोजना करायला हवेत.

### ७.२५ आई वडीलांना/पालकांना मदत करणारे बालक व बालिका बालकामगारांचे विश्लेषण (सहसंबंध) :

प्रस्तूत पाहणीत असे आढळून आले की असे बरेच कुटूंब आहेत तिथे वयस्क कामगार त्यांच्यासोबत आपल्या मुलांमुलींना मदतीसाठी घेऊन जातात. घरकाम करणाऱ्या बऱ्याच माता आपल्या मुलींना मदतीसाठी घेऊन जातात. त्यापाठीमागची भुमिका अशी असते की, कामात मदत होईल आणि मुल ते कामही शिकेल. प्रस्तुत अध्ययनात असे किती बालक व बालिका कामगार आहेत जे आपल्या पालकांना मदत करतात याचा सहसंबंध पुढील तक्ता क्र. ७.२५ मध्ये स्पष्ट केले आहे.

## तक्ता क्र. ७.२५

## आईवडील/पालकांना मदत करणारे बालक व बालिका बालकामगारांचे विश्लेषण

**Relationship between helping to parents and Gender of Child Labour**

| आईवडील/पालकांना मदत करणारे बालकामगार | | लिंग | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | बालिका | बालक | |
| आईवडील/पालकांना मदत करतात | उत्तरदात्यांची संख्या | ४१ | ११ | ५२ |
| | टक्केवारी | ७८.८% | २१.२% | १००.०% |
| एकूण | उत्तरदात्यांची संख्या | ४१ | ११ | ५२ |
| | टक्केवारी | ७८.८% | २१.२% | १००.०% |

पुढील आलेखामध्ये आईवडीलांना/पालकांना मदत करणारे बालक व बालिका कामगारांचे सहसंबंध दर्शविले आहे.

## आलेख क्र. ७.२५

## आईवडीलांना/पालकांना मदत करणारे बालक व बालिका कामगारांचे सहसंबंध




वरील तक्ता क्र. ७.२५ मध्ये आई वडीलांना/पालकांना मदत करणारे बालक व बालिका कामगारांचे विश्लेषण (सहसंबंध) दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये बालिका कामगारांचे प्रमाण ७८.८% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण २१.२% आहे. आई वडीलांना/पालकांना त्यांच्या कामात मदत करणाऱ्या बालिका कामगारांचे प्रमाण ७८.८% आहे

तर बालक कामगारांचे प्रमाण २१.२% आहे. आई वडीलांना/पालकांना त्यांच्या कामात मदत करणाऱ्या बालकामगारांमध्ये बालिका कामगारांचे प्रमाण जास्त आहे तर बालक कामगारांच्या प्रमाण कमी आहे.

यावरुन असे लक्षात येते की, बहूतांशी बालिका कामगार हे आपल्या आई वडीलांना/पालकांना त्यांच्या कामात मदत करण्यासाठी काम करतात. म्हणजेच बालिका कामगारांची परिस्थिती अत्यंत बिकट आहे.

### ७.२६ विशेष शाळेत शिक्षण घेणाऱ्या बालक व बालिका बालकामगारांचे विश्लेषण (सहसंबंध) :

भारत सरकारच्या राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पाच्या माध्यमातून बालक व बालिका कामगारांचे शैक्षणिक पुनर्वसन केले जाते. बालकामगार बहूलता क्षेत्रात व ज्या ठिकाणी बालक व बालिका कामगार आढळतात त्याठिकाणी सर्वेक्षण केले जाते आणि त्यांचे बालमजूरीतून निर्मुलन करुन शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात सामिल करुन घेतले जाते. वयानुसार बालिका व बालकांना त्या त्या वर्गात प्रवेश दिला जातो. शाळेत नियमित यावे व शाळा सोडून पुन्हा कामावर जाऊ नये म्हणून अशा विद्यार्थ्यांना विद्यावेतन दिले जाते. त्याचप्रमाणे गणवेश, शिक्षणाचे साहित्य, दुपारचे भोजन, आरोग्य सुविधा पुरविल्या जातात. पुढील तक्ता क्र. ७.२६ मध्ये विशेष शाळेत शिक्षण घेणारे बालक व बालिका कामगाराचे सहसंबंध स्पष्ट केले आहे.

**तक्ता क्र. ७.२६**

**विशेष शाळेतील बालक व बालिका बालकामगारांचे विश्लेषण**

**Relationship between Special School Child Labour and Gender of Child Labour**

| विशेष शाळेतील बालकामगार | | लिंग | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | बालिका | बालक | |
| इ. ३ री | उत्तरदात्यांची संख्या | २६ | १० | ३६ |
| | टक्केवारी | २०.०% | ७.७% | २७.७% |
| इ. ४ थी | उत्तरदात्यांची संख्या | ३१ | २४ | ५५ |
| | टक्केवारी | २३.८% | १८.५% | ४२.३% |
| इ. ५ वी | उत्तरदात्यांची संख्या | १३ | ७ | २० |
| | टक्केवारी | १०.०% | ५.४% | १५.४% |
| इ. ६ वी | उत्तरदात्यांची संख्या | ५ | ७ | १२ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | टक्केवारी | ३.८% | ५.४% | ९.२% |
| इ. ७ वी | उत्तरदात्यांची संख्या | ४ | ३ | ७ |
| | टक्केवारी | ३.१% | २.३% | ५.४% |
| एकूण | उत्तरदात्यांची संख्या | ७९ | ५१ | १३० |
| | टक्केवारी | ६०.८% | ३९.२% | १००.०% |

पुढील आलेखामध्ये विशेष शाळेत शिक्षण घेणाऱ्या बालक व बालिका कामगारांचे सहसंबंध दर्शविले आहे.

**आलेख क्र. ७.२६**

**विशेष शाळेत शिक्षण घेणारे बालक व बालिका कामगारांचे सहसंबंध**




वरील तक्ता क्र. ७.२६ मध्ये विशेष शाळेत शिक्षण घेणाऱ्या बालक व बालिका कामगारांचे विश्लेषण (सहसंबंध) दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये बालिका कामगारांचे प्रमाण ६०.८% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ३९.२% आहे. बालकामगारांच्या शैक्षणिक पुनर्वसनासाठी राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पाने विशेष शाळेची सोय केलेली आहे. या शाळेमध्ये बालकामगारांना त्यांच्या कामातून मुक्त करुन शैक्षणिक पुनर्वसन केले जाते. विशेष शाळेत इ. ३ री मध्ये शिक्षण घेणाऱ्या बालिका कामगारांचे प्रमाण २०.०% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ७.७% आहे. विशेष शाळेत इ. ३ री मध्ये शिक्षण घेणाऱ्या बालिका कामगारांचे प्रमाण जास्त आहे तर बालक कामगारांचे प्रमाण कमी आहे. विशेष शाळेत इ. ४

थी मध्ये शिक्षण घेणाऱ्या बालिका कामगारांचे प्रमाण २३.८% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण १८.५% आहे. विशेष शाळेत इ. ४ थी मध्ये शिक्षण घेणाऱ्या बालिका कामगारांचे प्रमाण जास्त आहे तर बालक कामगारांचे प्रमाण कमी आहे. विशेष शाळेत इ. ५ वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या बालिका कामगारांचे प्रमाण १०.०% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ५.४% आहे. विशेष शाळेत इ. ५ वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या बालिका कामगारांचे प्रमाण जास्त आहे तर बालक कामगारांचे प्रमाण कमी आहे. विशेष शाळेत इ. ६ वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या बालिका कामगारांचे प्रमाण ३.८% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ५.४% आहे. विशेष शाळेत इ. ६ वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या बालिका कामगारांचे प्रमाण कमी आहे तर बालक कामगारांचे प्रमाण जास्त आहे. विशेष शाळेत इ. ७ वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या बालिका कामगारांचे प्रमाण ३.१% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण २.३% आहे. विशेष शाळेत इ. ७ वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या बालिका कामगारांचे प्रमाण जास्त आहे तर बालक कामगारांचे प्रमाण कमी आहे.

वरील विश्लेषणावरुन असे लक्षात येते की, विशेष शाळेत शिक्षण घेणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण जास्त आहे तर बालक कामगारांचे प्रमाण कमी आहे. याचा अर्थ असा की, बालिका कामगारांना शिक्षणाची आवड आहे आणि त्या विशेष शाळेत शिक्षण घेत आहेत. परंतू बालक कामगारांची शिक्षणाबाबतची मानसिकता संकुचित आहे. त्यांना शिक्षणाच्या प्रती विशेष आवड नाही. त्यामुळे बालक कामगारांच्या शैक्षणिक पुनर्वसनाच्या बाबतीत अत्यंत गांभिर्याने लक्ष देणे आवश्यक आहे.